विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | १२ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५१**

MAHMAR 10338/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पहिले / अंक १९ / नोव्हेंबर २००१

## संपादकीय
## *दिवाळी, बदल आणि परंपरा*

काळाच्या ओघात सर्व काही बदलताना जाणवत आहे. बदलाचा वेग इतका आहे की पहिला बदल स्वीकारण्याच्या आतच नवीन काहीतरी स्वीकारण्याची तयारी ठेवावी लागत आहे. मानवी इतिहासात कधी नव्हता इतका हा वेगवान बदलाचा काळ आहे.

असं असलं तरी एकीकडे परंपरांचे आकर्षण माणसाला कायम असते. एकविसाव्या शतकातली पहिली दिवाळी साजरी करतानाही हे जाणवत आहे. खुले आर्थिक धोरण, जागतिकीकरण यांचा एक परिणाम म्हणजे खास दिवाळीसाठी थांबून काही वेगळं करावं असं नाही. उदा. कपडे खरेदी. आज कपड्यांतील नावीन्याच्या मोहापायी माणसं नेहमी अमाप खरेदी करतात. त्यामुळे दिवाळी म्हणजे नवीन कपडे घालायचे असं समीकरण करण्याची गरज नाही. तीच गत खाद्य पदार्थांची. दक्षिण-उत्तर भारतातील पदार्थांबरोबरच अमेरिकेतला पिझ्झा, चीनमधील नूडल्स इ. पदार्थ सदा सर्व काळ मिळत असताना, घरगुती चकल्या, लाडू चोवीस तास दुकानातून विकल्या जात असताना दिवाळी आणि फराळ, दिवाळी आणि मिठाई ही पारंपरिक समीकरणे चालूच आहेत. १९३५ च्या आगे मागे दिवाळी अंक सुरु झाले. आज 'अक्षर' दिवाळी सुरु असताना पुन्हा दिवाळी अंक वेगळे काढायलाच हवेत का ..... पण परंपरा चालू आहे.

ग्रीटींग, शुभेच्छा पत्र ही आज व्यावसायिक गरज ठरत आहे. त्यासाठी इंटरनेट वरील ग्रीटींगची पध्दत आज लोकप्रिय ठरत आहे. एकीकडे बदल स्वीकारणं चालू आहे. तर दुसरीकडे परंपराही जिवंत आहेत. परंपरांचा अभिमान असायलाच हवा, पण शहरी जीवनात या परंपरात काळानुसार काही बदल करायला हवेत का याचाही कोणीतरी विचार अमलात आणायला हवा. एकीकडे व्ही. आर. एस. ने निर्माण केलेले सामाजिक प्रश्न, जागतिक मंदी व अर्थ क्षेत्रातील प्रश्नांचे डोंगर, बेकारीचा भस्मासूर आणि एकीकडे ही पारंपरिक दिवाळी.... मनात विचारांचे संमेलन भरत. प्रत्येक विचार आपले मत व्यक्त करीत रहातो.

तरीही दिवाळी अंकांच्या या अंकातून काही वाचनीय मिळत रहाते, सगळ काही नावं ठेवण्यासारख नसतं. निदान त्यामुळे लेखक विचार करतात, विचार व्यक्त करतात, त्यातून कुठे तरी बीजारोपण होत रहातं हे ही महत्त्वाच आहे.

म्हणूनच दिवाळीच्या शुभेच्छा देताना पारंपरिक पध्दतीनुसार दीपावली आनंदाची जावो असं दिशातर्फे आम्ही म्हणतोय. विचारांच्या या व्यासपीठावरुन आपण सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

तमसो मां ज्योतिर्गमय ......!

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक १२ / नोव्हेंबर २००१ किंमत रु. २०/-

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. मानसी जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलिल बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | देवळातील गर्दी | वर्षा गटणे | ३ |
| २) | विद्याभ्यासातील परावलंबन विद्यार्थ्यांच्या प्रगतीस मारक आहे. | प्रभाकर द. अदरकर | ५ |
| ३) | '' याला जीवन ऐसे नाव'' | सुरेश देशपांडे | ९ |
| ४) | काळपुळी : जंतुयुद्धातील एक प्रभावी अस्त्र | डॉ. नागेश टेकाळे | १२ |
| ५) | एक श्रद्धांजली | मैत्रेयी शेवडे | १५ |
| ६) | युत्या, आघाड्या आणि राजीनामे | प्रशांत देशमुख | १६ |
| ७) | एकतर्फी प्रेम आणि हिंसा | सृष्टी शिवानंद अंकोलीकर | १९ |
| ८) | २१व्या शतकात माहितीचे मूल्य : महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या दृष्टीने | मेधा खरे | २२ |
| ९) | 'प्रसारमाध्यमे - आणि मानवी विकास' | निशा चंद्रकांत जाधव | २८ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही

# देवळातील गर्दी

*रांगा लावून देव दर्शन घेण्याचा आजचा काळ आहे. देवळात एवढी गर्दी वाढली म्हणजे भक्ती वाढली असं मानणं बरोबर आहे. नेमके कशासाठी जातात लोक देवळात.....त्या बद्दलचे विचार करणारा लेख. - संपादक*

देवळातील गर्दी हा नेहमी माझ्या एक कुतुहलाचा आणि अभ्यासाचा विषय असतो. खवय्ये जसे हॉटेलात गर्दी करतात. त्याप्रमाणे हे 'हवय्ये' ('हे' हव आहे, ते हव आहे अस देवाकडे मागणारे) समस्त 'हवय्ये' देवळात गर्दी करतात अस मला वाटत. प्रत्येकाची 'फर्माइश' वेगळी असते देवाकडे. आणि पट्टीचा खवय्या जसा दरवेळी हॉटेलात नव्या डिशेश 'टेस्ट' करतो आणि नित्य नव्या चवींच्या शोधात असतो. त्याप्रमाणे एका 'हवय्या' ची मागणी ही दरवेळी वेगळी असू शकते. बहुसंख्य लोक देवळात जातात ते काही स्वामी विवेकानंदाप्रमाणे देवाकडे मला 'बुद्धी दे, तेज दे, वैराग्य दे' असलं खरखुर मागणं मागायला जात नाहीत. कुणाला नोकरी हवी असते तर कुणाला छोकरी. मग त्यासाठी 'दक्षिणा' रुपी 'कमिशन' देवाला आगाऊ स्वरुपात दिल जातं. तसच काम झाल्यावर पेढ्यांचा वगैरे 'बोनस' देण्याचही कबूल केल जात. पुजारी नामक मध्यस्थाच्या साथीने असा हा 'व्यवहार' एकूण चालत असतो.

हॉटेलात 'वाऱ्या' करणारे ते खवय्ये, 'बार' मध्ये नियमित हजेरी लावणारे ते 'मदिराप्रेमी' ह्या धर्तीवर जे देवळात जातात ते धार्मिक असं साधारण मानलं जातं. आता ज्या अर्थी देवळातील गर्दी वाढत आहे. ह्या अर्थी लोकांची धार्मिकता दिवसेंदिवस वाढत आहे अस मानायचं का? **मुळात लोक देवळात जाताहेत तेकाही त्यांचा देवाधर्मांवर अचानक खराखुरा विश्वास बसू लागलाय म्हणून नव्हे तर त्यांचा एकेमेकांवरचा अविश्वास वाढू लागलाय म्हणून.** मनातील अस्थिरता, अशांतता किंवा भिती यापासून सुटका व्हावी म्हणून ते नाईलाजाने जातात. लोकांना कसली एवढी असुरक्षितता, भिती वाटते? 'दोन नंबरवाल्या', श्रीमंतांना वाटत इन्कम टॅक्सची धाड पडेल का ? तर कुणाला लाच घेताना पकडले जाऊ याची भीती, कुणाला प्रमोशनची चिंता तर कुणाला पेन्शनच टेन्शन. आपल्या ह्या साऱ्या भानगडी आणि उचापती देवानं निस्तराव्यात (बसल्या बसल्या नाहीतरी त्याला उद्योग तरी काय असतो म्हणा दुसरा) एवढीच माफक इच्छा ह्या भक्तांची असते. 'पुलं' च्या भाषेत सांगायच तर लोकांना अध्यात्माची नुसती 'भूक' नव्हे तर 'खवखव' सुटलीय. आणि खवखव सुटण हे मानसिक अनारोग्यचं कारण आणि शारिरीक अनारोग्याच कारण असतं. लोकांची ही वाढती 'खवखवं' भागवण्यासाठी म्हणून 'मागणी तसा पुरवठा' हा तत्वात अनेक माता काय, गुरुजी काय, झालच तर स्वामी महाराज त्यांनी 'अवतार' घेतले आहेत. देवळं काय, आश्रम काय, मिशन काय, भक्तीमंडळ काय 'श्रद्धा' या पब्लिक भांडवालावर चालणाऱ्या अनलिमिटेड कंपन्याच ह्या ?

आजकाल एक गंमतीशीर ट्रेंड दिसून येतो. मुख्यतः तरुणवर्गांमध्ये रस्त्यानं जातांना मध्ये कुठतरी एखादं देऊळ दिसल की अगदी गॉड फपड्यातील टीना किंवा मायकल जॅक्सनचा जुळा भाऊ वाटावा असा एखादा 'हायफाय' चिंटू देवळाच्या दिशेने थोडसा 'फ्लाईंग किस' केल्यासारखं आणि थोडस ख्रिश्चन लोकांसारखं 'क्रॉस' केल्यासारखं असा काही तरी नमस्कार करतात. कशासाठी हा देखल्या देवा दंडवत ? आपण धार्मिक आहोत हे दाखवण्यासाठी की 'जस्ट फॉर द सेक ऑफ फन' साठी म्हणून रस्त्यात एखादा मित्र किंवा मैत्रिण भेटली तर 'हाय हॅलो' करायचं तस ते देवालाही 'हाय' करतात की काय कोण जाणे ?

देव आणि धर्म ह्या दोन्ही संकल्पनांचा जन्म माणसाच्या प्रारंभाच्या काळात त्याच निसर्गाविषयी असलेल्या अज्ञान आणि त्यामुळे वाटणारी भीती ह्यातून झाला आहे. आदिमानवाच्या स्थितीतला माणूस हा सर्वात दुबळा, आणि असहाय्य प्राणी होता. नैसर्गिक कोप आणि इतर रानटी प्राण्यांपासून त्याला सतत धोका असायचा. ह्यातून मग मानसिक सुरक्षितता शोधण्यासाठी आणि आपल्यापेक्षा शक्तिमान घटकांना आपलसं करणाच्या हेतूने हा आदिमानव सिंह, हत्ती, साप झालंच तर नदी, पर्वत, चंद्र, सूर्य वगैरेंना देव मानून पूजू लागला. त्याला खूष करण्यासाठी 'बळी' देऊ लागला. हा स्वतःचं अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न होता. कालांतराने जसजसे माणसाने ज्ञान प्राप्त केले तसतशी त्याची निसर्गाविषयी वाटणारी भिती नाहीशी झाली. इतकेच नव्हे तर आपल्या बुद्धीच्या जोरावर तो इतर प्राण्यांवर आणि काही प्रमाणात निसर्गावर काबू ठेवू लागला. स्वतःच्या सामर्थ्याचा प्रत्यय आल्यावर मग माणसाची 'देव' ही संकल्पनाही जरा वरच्या दर्जाची झाली. देव आता भूलोकीची गोष्ट नसून ती अद्वितीय, अलौकिक साऱ्या विश्वावर नियंत्रण ठेवणारी अशी शक्ती आहे, असं मानल जाऊ लागल. ह्यानंतरच 'धर्म' ही कल्पना रुजू लागली. पोथी पुराण, होमहवन, जप-तप, उपास-तापास, दानधर्म वगैरे गोष्टी प्रचलित झाल्या. माणसाची निसर्गाबद्दलची भीती जरी बऱ्याच अंशी नष्ट झाली असली तरी त्याला वाटणार मृत्यू आणि दुःखाच भय हे काही तिळमात्रही कमी झालेल नाही आणि होणारही नाही. म्हणजेच आजही त्याची धार्मिकता किंवा देवभोळेपणा ही भीतीवरच आधारित आहे अस खेदाने म्हणाव लागते. काही जणांच मत अस असत की सर्वसामान्य माणूस हा भावनेवर, श्रद्धेवर जगणारा असतो. सर्वच जण बुद्धीवादी, तर्कशुद्ध विचार करणारे असे होऊ शकत नाहीत. म्हणून मग जर पापपुण्याच्या किंवा स्वर्गनरकाच्या खोट्या भीतीमुळे का होईना धर्म त्यांना चांगल बनवत असेल तर बिघडलंच कुठ? श्रद्धा हवी हे खरं. पण जी श्रद्धा खोट्या आणि पोकळ गोष्टीवर आधारलेली असते ती माणसाला कधीच चांगल बनवू शकत नाही. उलट ती त्याला दांभिक मात्र हमखास बनवते. दगडातील देव पाहणारे म्हणून आपल्या धार्मिकतेचा टेंभा मिरवणारे आपण आपल्यासारख्याच हाडामासाच्या दुसऱ्या माणसाला साधी माणुसकी दाखवत नाही, त्याच्यातल्या देवत्वाचा अंश आम्हाला जाणवत नाही. आमची धार्मिकता ही फक्त देवळापुरतीच मर्यादित असते. देवळात जातांना आम्ही-चप्पल बाहेर काढून जातो आणि बाहेर पडतांना धार्मिकता मागे ठेवून येतो. ती आचरणात आणायची गोष्ट आहे हे सोयिस्कर विसरतो. आणि पुन्हा एकदा नव्या दमाने स्वार्थ आणि मोहाच्या शर्यतीत उतरतो.

विचारांवरची 'डोळस' श्रद्धा वाढवणारी पुस्तक वाचण्यापेक्षा आंधळेपणात कुठल्याही शेंदूर फासलेल्या दगडाला नमस्कार करणारी, एखाद्या 'बाबांच्या' मागे लागणारी तथाकथित आधुनिक आणि उच्चशिक्षित तरुण-तरुणी पाहिली की शिक्षणाचा आणि प्रगल्भतेचा काडीचाही संबंध नसतो हेच सिद्ध होत. पण ह्यात फक्त त्यांचाच दोष नसतो. त्यांच्या आईवडिलांनी त्यांना लहानपणी अगदी तत्परतेने देवळात नेलेल असत. पण पुस्तकाच्या दुकानात आवर्जून घेऊन जाऊन, पुस्तक विकत घेऊन ती वाचायला देऊन, त्यावर चर्चा करुन त्यांना डोळस पणे, तर्कशुद्ध विचार करायला प्रवृत्त करत नाहीत. खरं मानसिक सामर्थ्य आणि शांति मिळवण्यासाठी माणसानं भावनाशीलतेपेक्षा वैचारिकतेवर श्रद्धा ठेवावी आणि त्यासाठी चांगल्या चांगल्या पुस्तकांचं वाचन ह्यासारखा दुसरा उत्तम उपाय नाही. म्हणूनच पुस्तकांची दुकान आणि ग्रंथालयं हीच खरी आजच्या काळात देवालये व्हावीत अस मला मनापासून वाटतं.

**वर्षा गटणे**
अ/३०२, विनायक सोसायटी, मीठबंदर रोड, ठाणे.

• • •

# विद्याभ्यासातील परावलंबन विद्यार्थ्यांच्या प्रगतीस मारक आहे

*विद्याभ्यासात खऱ्या अर्थाने प्रगती करायची असेल तर आत्मनिर्भर बनण्यास पर्याय नाही. कोणत्या ना कोणत्या बाह्य गोष्टींवर अवलंबू रहाण्याने प्रगतीत अडथळे निर्माण होतात. - संपादक*

शिक्षणाच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. 'मुलाचा बौध्दिक शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, नैतिक-एक दरीत सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण'. 'मुलाच्या अंगभूत किंवा उपजत गुणांच्या आविष्काराला (प्रकटीकरणाला) आणि त्यांच्या विकासाला संधी प्राप्त करून देणे म्हणजे शिक्षण'. ह्या सर्वच व्याख्यांचा अभ्यास केला असता एक गोष्ट आपल्याला प्रकर्षाने जाणवते की शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षकाचे स्थान महत्त्वाचे असले तरी विद्यार्थ्यांच्या नंतरचे आहे. शिक्षण हे बालकेंद्रित असले पाहिजे. शिक्षकांच्या शिकवण्यापेक्षा मुलांच्या शिकण्याला अधिक महत्त्व आहे. शिक्षकांची भूमिका ही मदतनीसाची आहे, मार्गदर्शकाची आहे. (Friend, Philosopher and guide) शिक्षकाने विद्यार्थ्यांना कसे शिकायचे, ज्ञान कसे मिळवायचे हेच शिकवायचे आहे. 'A pupil is not an empty vessel to fill in, but it is a torch to light' शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या उपजत जिज्ञासू वृत्तीला प्रेरित करून त्यांच्यामध्ये ज्ञानलालसा निर्माण करावयाची आहे. एकंदरित विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष स्वानुभवातून शिक्षण घ्यावयाचे आहे, ज्ञान मिळवायचे आहे. आणि त्यासाठी स्वयं-अध्ययनाची आणि स्वाध्यायाची गरज आहे. संपादित ज्ञानाच्या दृढीकरणासाठी सराव आवश्यक आहे. कारण अभ्यासामुळेच ज्ञान पक्के होते. आणि हा अभ्यास विद्यार्थ्यांने ज्याचा त्यानेच करावयाचा आहे.

परंतु आज आपल्याला समाजामध्ये काय चित्र पहावयास मिळते ? स्वयमेव मृगेन्द्रता ही उक्ती सार्थ ठरविणाऱ्या एकलव्याचे उदाहरण आपल्या गौरवशाली इतिहासामध्ये आहे. गुरू द्रोणाचार्यांचा केवळ पुतळा उभारून त्या स्फूर्तीच्या जोरावर स्वयं-अध्ययनाने, सरावाने, धनुर्विद्येमध्ये, एकलव्याने शैक्षणिक वारसा किंवा परंपरा नसलेल्या एका आदिवासीने-धनुर्धर अर्जुनाहून प्रावीण्य मिळविले. अभ्यासाला पोषक असे वातावरण एकलव्याला लाभले होते का ? गुरूच्या योग्य मार्गदर्शनाची जोड त्याला लाभली होती का ? मग हे दिव्य एकलव्य कशाच्या जोरावर मिळवू शकला ? तर अभ्यासातील स्वावलंबनाच्या जोरावर परंतु ह्याउलट आज आपल्याला समाजामध्ये अशी उदाहरणे पहावयास सापडतात की, घरचे वातावरण शिक्षणाला पोषक आहे. सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत आणि विद्यार्थी मात्र परीक्षेमध्ये अपयशाचे धनी होत आहेत. प्रावीण्य संपादन करणे दूर राहो, परंतु किमान ३५% गुण मिळवून उत्तीर्ण होणे हे ही त्यांच्या आवाक्याबाहेरचे होत चालले आहे. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांचे विद्याभ्यासातील परावलंबन असे मला वाटते. या परावलंबनाचे चार प्रकार करता येतील.

१) गृहपाठासाठी आईवडिलांवर किंवा पालकांवर अवलंबून असणे.

२) कोचिंग क्लासेस किंवा खाजगी शिकवणी वर्गांवर अवलंबून असणे.

३) गाईड्स् किंवा मार्गदर्शक पुस्तकांवर अवलंबून असणे.

४) शिक्षकांवर गरजेपेक्षा जास्त प्रमाणात अवलंबून असणे.

**१) गृहपाठासाठी आईवडिलांवर किंवा पालकांवर अवलंबून असावे.**

गृहपाठासाठी विद्यार्थी आईवडिलांवर किंवा पालकांवर अवलंबून राहत असतील, तर ते इ. ४ थी पर्यंत फार तर समजण्यासारखे आहे. विशेषतः शिशुवर्गामध्ये मुलांना अभ्यासाचे महत्त्व कळू शकत नाही. कारण त्यांचे वय त्याच्या आकलना पलीकडे असते. त्यामुळे पालकांनी त्यांना अभ्यासाला बसवून, त्याच्याकडून अभ्यास करवून घेणे हे अपेक्षितच आहे. परंतु मदत ह्याचा अर्थ विद्यार्थ्यांचा संपूर्ण गृहपाठ पालकांनी स्वतःच करणे असा होत नाही. पालकांनी मुलांना अडलेला भाग समजावून देणे, त्याच्या शंकांचे निरसन करणे, विद्याभ्यासातील अडचणी दूर करणे हेच खरे मार्गदर्शन होईल. विद्यार्थ्यांच्या बाबतीतील हे परावलंबन वयपरत्वे, वरच्या इयत्तांमधून क्रमशः कमी प्रमाणात हो जाणे आवश्यक आहे.

**(२) कोचिंग क्लासेस किंवा खाजगी शिकवणी वर्गांवर अवलंबून असणे.**

आजकाल कोचिंग क्लासेसना जाणे किंवा मुलांना खाजगी शिकवणी वर्गाला पाठविणे किंवा श्रीमंत पालकांच्या बाबतीत मुलांच्या अभ्यासासाठी खास शिक्षक दिमतीला ठेवणे ही फॅशन रूढ होऊ पहात आहे. ते एक फॅड झाले आहे. आजकाल आईवडिल दोघेही नोकरी करत असल्यामुळे त्यांना मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यायला फुरसत मिळत नाही. मग मुलांना कुठे तरी अडकवून ते आपल्या जबाबदारीतून मोकळे होत असतात. विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासेसचा थोडाबहुत फायदा होत असेलही परंतु तो सामान्य मुलांना! पुनरावृत्ती मुळे सामान्य मुलांना एक प्रकारचा सराव मिळतो आणि त्याचा फायदा त्यांना कित्येकदा परीक्षेमध्ये जेमतेम उत्तीर्ण होण्यापुरता होत असेल. परंतु त्यामुळे विद्यार्थ्यांचे विद्याभ्यासातील परावलंबन वाढत आहे, त्याचे काय? क्लासेसमध्ये लिखित मजकूर (रेडिमेड मटेरिअल) पुरविले जाते. त्यामुळे विद्यार्थी स्वतः प्रयत्न करून, काही माहिती संग्रहित करील असे घडत नाही. क्लासेसना पाठांतरावर जास्त भर दिला जातो. त्यामुळे त्यांची विचारशक्ती कमी होऊन ते केवळ आपल्या स्मरणशक्तीवर विसंबून राहू लागतात. क्लासेसमध्ये विषय जास्तीत जास्त सोपा करून शिकविण्याच्या अवास्तव हट्टापायी Spoon feeding केले जाते. आणि ते विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला मारक आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः पृथ्थकरण करून निष्कर्ष काढले पाहिजेत. ती त्यांची सवयच खुंटते. पाय धडधाकट असताना कुबड्या घेऊन चालण्यासारखे ते आहे. बरे हे क्लासेस वरील अवलंबित्व एस्. एस्. सी. पर्यंत काही प्रमाणात समर्थनीय आहे. कारण एस्. एस्. सी. पर्यंत Comprehension Level असल्यामुळे विद्यार्थ्याला आपल्याला Jack of everything, Master of none बनवायचा असल्यामुळे येन केन प्रकारे मुलाने किमान ३५% गुण मिळवून एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण होणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट असल्यास ते साध्य व्हायला क्लासेस पूरक ठरू शकतील.

परंतु महाविद्यालयीन विद्यार्थीसुध्दा क्लासेसना जाताना दिसतात. तेव्हा आपल्याला आश्चर्याचा धक्काच बसतो. आता विद्यार्थ्यांनी अभ्यासाची अशी पातळी गाठलेली असते की त्यांनी Self study (स्वयंअध्ययन) करावयास हवे. Specialization चा हा काळ असतो. त्यांनी स्वतःच अधिक सखोल अभ्यास (Intensive Study) करणे आवश्यक असते. स्वतः संदर्भ ग्रंथ वाचून, अवांतर वाचन करून, टिपणे काढणे देखील अपेक्षित असते. परंतु तसे होताना दिसत नाही. विज्ञान शाखेची मुले गणित आणि विज्ञानाच्या सर्व शाखा (Physics, Chemistry, Biology) यांच्या क्लासेसना जाताना

दिसतात. तर वाणिज्य शाखेची मुले Book Keeping and Accountancy तर कलाशाखेची मुले इंग्रजीच्या क्लासेसना जाताना दिसतात. हे विद्यार्थ्यांच्या विद्याभ्यासातील परावलंबत्वाचे द्योतक नव्हे काय ?

**(३) गाइड्स् किंवा मार्गदर्शक पुस्तकांवर अवलंबून असणे.**

गाइड्स किंवा मार्गदर्शनपर पुस्तिकांवर अवलंबून राहणे ही सुध्दा अशीच एक चिंतेची बाब आहे. खालच्या वर्गांतून (इ. ४ थी पर्यंत) गाईड्सचा वापर शक्य आहे. पुढे इ. ५ वी पासून विद्यार्थ्यांनी गाईड्सवर अवलंबून राहता कामा नये. इ. ४ थी पर्यंतच्या मुलांना मुद्देसूद उत्तरे कशी लिहावयाची हे माहीत नसते. अशा वेळी गाईड उपयुक्त ठरू शकेल. परंतु पुढे इ. ५ वी पासून विद्यार्थ्यांनी स्वतः पुस्तक वाचून, त्यातून उत्तरे शोधून काढणे आणि ती स्वतःच्या शब्दात मुद्देसूद लिहून काढणे हे कौशल्य संपादन करणे आवश्यक आहे. **गाईडच्या अतिवापरामुळे मुले क्रमिक पुस्तके मुळातून वाचतच नाही.** असे दृष्टी? येते आणि हे लक्षण काही ठीक नाही. विशेषतः विज्ञान शाखे कडील काही विद्यार्थी इंग्रजीचे क्रमिक पुस्तक विकत घेतलेले देखील नसते. ही चिंता करण्यासारखी बाब आहे. एस्. एस्. सी. पर्यंत सुध्दा गाईडचा वापर केला जातो. गाईडचा वापर पूरक वाचनासारखा केला तर फायदेशीर ठरू शकेल. परंतु गणितासारख्या विषयामध्ये गाईडचा वापर फारच हानिकारक ठरू शकेल. **त्यामुळे विचार करण्याची शक्तीच खुंटेल.** आणि जिथे Self - Expression अपेक्षित असते. तिथे देखील गाईडच्या वापराने नुकसान होईल स्वतःचे विचार, भावना मोजक्याच परंतु समर्थन परिणामकारक शब्दात आणि शैलीत मांडता येणे आवश्यक आहे. निबंध लेखनासाठी गाईडचा वापर झाल्यास हा हेतु कसा साध्य होणार ? महाविद्यालयीन काळामध्ये Peper Solutions चा वापर असाच मारक ठरू शकेल.

**(४) शिक्षकांवर गरजेपेक्षा जास्त प्रमाणात अवलंबून असणे.**

विद्यार्थ्यांने शिक्षकांवर मार्गदर्शनासाठी अवलंबून असणे, तसे आक्षेपार्ह ठरू नये. कारण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे हे शिक्षकाचे आद्य कर्तव्यच आहे. परंतु त्यालाही काही मर्यादा आहेत, ज्या शिक्षकाने पाळल्याच पाहिजेत आणि विद्यार्थ्यांनी देखील त्यांचे उल्लंघन होऊ देता कामा नये. शिक्षकाची भूमिका मदतनीसाची आहे, मार्गदर्शकाची आहे. आपल्या ज्ञानाचा मागणीप्रमाणे पुरवठा करणाऱ्या विक्रेत्याची नाही. याचे स्मरण शिक्षकांनी ठेवले पाहिजे. शिक्षकाची मदत ही विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययन प्रक्रियेला मारक ठरता कामा नये. त्याच्या विचारशक्तीला बाधक ठरता कामा नये. विद्यार्थ्यांना आपल्याला पंगू बनवायचे नसून, त्यांना त्यांच्या पायावर उभे करावयाचे आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे शिक्षकांवरील अवलंबित्व कमी होणे हेच चांगल्या शिक्षकाचे लक्षण आहे. जो कमीत कमी शिकवतो, परंतु विद्यार्थी मात्र जास्तीत जास्त शिकतात, तोच खरा शिक्षक. **विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देणे प्रेरणा देणे हेच शिक्षकाचे काम आहे.** गणितासारख्या विषयामध्ये सर्व उदाहरणे स्वतःच सोडवून देणारा शिक्षक हा काही चांगला शिक्षक नव्हे. शिक्षकाने सर्व उदाहरणे सोडवून देण्याचे कॉन्ट्रॅक्ट घेतलेले नसते. गणित विषय फार सोपा करून शिकवू नये. कारण त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला काहीच वाव उरत नाही. काही नमुना उदाहरणे सोडवून दाखविल्या नंतर सरावासाठी दिलेली उदाहरणे विद्यार्थ्यांना सोडवता आली पाहिजेत. अवघड उदाहरणे सोडवून दाखवायचीच झाल्यास मुलांच्या मदतीने सोडवून दाखविणे अधिक उत्तम, अधिक श्रेयस्कर जी गोष्ट गणिताच्या बाबतीत तीच गोष्ट भाषा विषयांमध्ये निबंध लेखनाच्या बाबतीत. इंग्रजीसारख्या परकीय भाषेच्या अध्यापनामध्ये सुरूवातीचे काही निबंध शिक्षकांनी लिहून देणे, ते सुध्दा इ. ७ वी पर्यंत,

समजण्यासारखे आहे. परंतु एखी निबंध लिहून देण्यासारखी घातक गोष्ट नाही. कारण त्यामुळे निबंध लेखनाचा मूळ उद्देशच साध्य होऊ शकत नाही. निबंध लिहून दिला म्हणजे आत्मप्रकटीकरणाला वाव कसा मिळणार ? त्यावर बंधने आली. प्रत्येकाला स्वतःचे विचार, भावना, कल्पना त्याच्या शब्दात आणि शैलीत मांडता यावयास हव्यात. आणि तो एक आगळा आनंद आहे. आणि आपण त्यापासून विद्यार्थ्यांना वंचित करता कामा नये. यासाठी फार तर निबंधाच्या मुद्यांची वर्गात चर्चा केली जावी. परंतु त्याचे टिपण देखील फळ्यावर करू नये, असे माझे मत आहे. नाहीतर फळ्यावर लिहिलेल्या मुद्यांच्या अनुषंगानेच लिहिण्याचा मुलांना मोह होतो आणि ते खचितच हितावह नाही. परिक्षेला न झालेला विषय निबंधलेखनाला आला की, मुलांना तो निबंध व्यवस्थित लिहिता येत नाही. ते ह्याच कारणामुळे गणित विषयाच्या बाबतीतही नेमके हेच घडते. वर्गात विद्यार्थी शिक्षकांच्या मदतीने उदाहरणे बरोबर सोडवताना आपल्याला दिसतात. परंतु परीक्षेच्या वेळी, त्यावेळी त्यांना स्वतंत्रपणे विचार करून उदाहरणे सोडवता येत नाहीत, असा अनुभव येतो. याचे कारण शिक्षकांवरील अवाजवी परावलंबित्व उदाहरणांमधील आकड्यांमध्ये जरी बदल झाला किंवा प्रश्नाचे स्वरूप जरी बदलले किंवा उत्तरे अपूर्णांकामध्ये झाली तरी मुले गडबडतात, याचे कारण हेच की, स्वतंत्र रित्या विचार करण्याची सवयच नसते. आणि शिक्षकांवरील फाजील परावलंबित्व !

विद्यार्थ्यांचे विद्याभ्यासातील परावलंबित्व कमी होऊन ते आत्मनिर्भर झाल्यास त्यांची शैक्षणिक प्रगती निश्चित होईल आणि परीक्षेमध्ये यश संपादन करणे त्यांच्या दृष्टीने एक सुगम गोष्ट ठरेल अशी मला आशा वाटते.

**श्री. प्रभाकर द. अरदकर**
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

•••

एकविसाव्या शतकात समाज सुधारकांची एक नवी पिढी उदयास आली तीत जोतिबा फुले यांचे स्थान अग्रगण्य आहे. छत्रपती शिवाजीमहाराजांनी प्रतिष्ठापना केलेल्या मराठी राज्याला पुढे पेशव्यांनी सुमारे शंभर वर्ष चालविले. कर्तबगार व न्यायनिष्ठ राज्यकर्त्यांनी आसेतु हिमाचल आपल्या विक्रमाचा दरारा निर्माण केला. परंतु रावबाजींच्या भ्रष्ट कारकिर्दीत मराठी सामाजिक वा सांस्कृतिक क्षेत्रातील अःपतन व पिछेहाटीने अवकळा आली होती. मोडकळीस आलेले शासन समूळ नष्ट करायला इंग्रजांना फारसे सायास पडले नाहीत. आधीच हतबल झालेल्या मध्यम व कनिष्ठ वर्गीयांच्या परिस्थितीत इंग्रजी राजवटीत फारसा बदल घडू शकला नाही. या पार्श्वभूमीवर महात्मा जोतिबा फुले यांनी केलेले समाज सुधारणेचे कार्य युगप्रवर्तक ठरले. साधने व सोयी यांचा अभाव असूनही आत्मविश्वास पूर्वक त्यांनी चोखाळलेली पायवाट स्तिमित करणारी आहे.

# " याला जीवन ऐसे नाव "

रामशास्त्री चित्रपटातील सदाबहार गीत " याला जीवन ऐसे नाव.....!" हे गाणे ऐकून मनास आलेले विचार दिशाचे एक वाचक श्री. सुरेश देशपांडे यांनी लेख रुपाने पाठवले आहेत. माणसातले तत्त्वज्ञान आत्मसात करणारे गीत पुन्हा ऐकावे असे वाटायला लावणार असे आहे. - संपादक

*दोन घडीचा डाव याला जीवन ऐसे नाव ।*
*जगताचे हे सुरेख अंगण खेळ खेळुया सारे आपण ।*
*रंक आणखी राव याला जीवन ऐसे नाव ॥ १ ॥*

कवी शांताराम आठवले यांचे हे भावपूर्ण, अर्थपूर्ण गाणे जुन्या प्रभातच्या 'रामशास्त्री' या चित्रपटातील. लहानपणीचे रामशास्त्री (अनंत मराठे) आणि त्यांची निरागस पत्नी या दोघांच्या तोंडी सागर गोटे खेळत असताना इतके चपखल बसवले आहे की पन्नास-बावन्न वर्षे झाली तरी ते अजूनही लोकांच्या स्मरणात आहे. सुप्रसिध्द संगीतकार कै. केशवराव भोळे यांनी अगदी सहजपणे कुणालाही गुणगुणता येईल अशी मोहक चाल आणि संगीत देऊन हे गाणे अत्यंत प्रभावशाली व लोकप्रिय झाले आहे.

जगताचे हे सुरेख अंगण आहे, पण त्यात खेळ खेळणारे लोक नेहमी हुतुतूचाच खेळ का खेळतात ? याचे कोडे उलगडत नाही. एकमेकांचे पाय खेचणे हा हुतूतूचा खेळ खेळताना खेळताना तुमच्या तंगड्या-गुडघे निकामी होतात याकडे त्यांचे लक्षच नसते. प्रत्येक वेळी हॉकीच्या 'स्टीकस्' एकमेकांच्या डोक्यात घालून, जखमी करून वेदना देणे या दुःखदायक खेळातच का रस घेतात हेही कळत नाही. रंक आणि रावांची लढाई तर आज कित्येक पिढ्यान पिढ्या चालत आली आहे. त्याला आताची पिढी अपवाद कशी होणार ? इतिहासातून गरीबीला दिलेला शाप आणि रावांना दिलेले वरदान यात रस्सीखेच चालून राहणार ! कितीही 'गरिबी हटाव'चे नारे लावले तरी राव आणि रंक यांच्यातली ही दरी कधीच कमी होणार नाही. पिढ्यान पिढ्या रावांची सेवा करणारी पिढी (रंकाची) मजूर, वेठबिगारी कामगार, कारकून, कंपांउंडर, शेतकरी घरकाम करणारे घरगडी, हे त्यांच्या त्यांच्या स्थितीमध्येच राहणार आहेत फक्त आयुष्याच्या उत्तरार्धात आपण काय कमावले? काय गमावले ? आणि काय टिकवले ? याचा हिशेब करता करता कठपुतलींची दोर आढून तुम्ही केव्हा वर खेचले जाल? याचा भरवसा नसतो.

या गाण्याचे कवीने स्वतःचे मन आक्रंदून त्यांनी रावांना आणि रंकांना खेळ खेळायला उद्युक्त केले आहे, पण तो कविमनाचा हेतु विफल झाल्याचे आपण पहातोच. यानंतरचे दुसरे कडवे असे

माळ यशाची हासत घालू !
हासत हासत तसेच झेलू पराजयाचे घाव ।
झेलूया पराजयाचे घांव । याला जीवन एसे नाव ॥ २ ॥

या कडव्यातून सांगायचे आहे की जीवनात नेहमीच यश मिळते असे नाही, तेव्हा अपयश किंवा पराभव झेलायला, पचवायला शिका ! परंतु आपल्या या जीवनात पराजयाचे घाव झेलायला कुणीच तयार नसते. प्रत्येकाला यशाची माळ हवी असते. मला यश मिळणारच ! यश मिळणे हा माझा जन्मसिध्द हक्क आहे ! अशा विचारांनी प्रेरित झालेली युवापिढी आणि यांना प्रोत्साहित करणारी त्यांचे आई-वडील, पोशिंदे, किंवा पालनकर्ते यांना पराजय सहन करायला जमत नाही. आणि मग मात्र निराशेच्या गर्तेत सापडून शून्याकडे पहात जगणे, त्यांना क्रमप्राप्त होते.

कुठल्याही नाण्याला दोन बाजू असतातच (अपवाद फक्त 'जय'व विरुद्ध नाण्याचा इमले मधल्या) होकार-नकार यश-अपयश, जय-पराजय !! पतंग कितीही वर आकाशात गेला तरी बलवान, मजबूत पक्का धागा त्याला काटून आसमंतात गटांगळ्या खायला लावतोच. मग तो सुदैवाने झाडाच्या फांदीवर लटकला तर तो तिथेच टांगून राहतो. "ना घर का ना घाटका" म्हणून अपयश पचवायला शिकले पाहिजे !! दोन पदरांच्या गाठी जन्मोजन्मी न सुटण्याकरता जरी बांधल्या तरी प्रत्यक्ष जीवनात त्या कुणाला तरी सोडवाव्या लागतातच की !!

आयुष्याचा 'टॉस' जिंकून सुध्दा संसाराच्या मैदानात सामना हरणारे, एकमेकांना चारी मुंड्या चीत करणारे कितीतरी महाभाग आपण पहातो. पराजयाचे घाव झेलायला तुमच्या मनाची केवढी तयारी लागते, निराश होऊन चालत नाही. सीतामाईला लंकेला रावणाने नेल्यावर तिथून सोडवताना वानरसेना समुद्रातून पार कशी करावी ? हा यक्षप्रश्न प्रभु रामचंद्राला एक ऐहिक व्यक्ती म्हणून पडला होता. पण रामनामाचे महत्त्व लोकांना समजावे म्हणून हनुमाना करवी प्रत्येक दगडावर राम लिहून ते दगड तरंगून, रामसेतु वरून लंकेत प्रवेश मिळवला हे सत्य नाकारता येत नाही. तसेच युध्दात लक्ष्मण बेशुध्द झाल्यावर प्रभु रामचंद्रांनी सुध्दा आणीबाणीची सभा घेऊन जांबुवताचा सल्ला घेऊन, तात्पुरत्या परभवाचा होइना घाव झेलला होता यालाच जीवन म्हणतात. राजकारकरणात यशाची माळ आपल्याच गळ्यात पडावी म्हणून माना खाली झुकवून झुकवून 'स्पॉडीलायसीस' झाल्याने गळपट्टे अडकवून पट्ट्याच्या वर माना काढून बसलेले असतात. कित्येकांच्या माना दिसत सुध्दा नाही. हे पराभवाचे घाव कसे झेलणार बोला !! तिसरे कडवे असे

मनासारखा मिळे सवंगडी ।
खेळाया मग अवीट गोडी ।
दुःखाला नच वाव - दुःखाला नच वाव ।
याला जीवन ऐसे नाव ॥ ३ ॥

मनासारखा सवंगडी जीवनात प्रत्येकाला हवा असतो. पण रनआऊट न करणारा, फाऊल न करणारा, 'लक्ष्मण रेषा' न ओलांडणारा, सवंगडी मिळाला तर खेळ खेळायला एक वेगळीच मजा, खुमारी, एक अप्रतिम गोडी येते. अशी पती-पत्नीची जोडी मिळाली तर ? पण नियतीला हे मान्य नसते कधी कधी !! दूध-साखरेत मीठाचा खडा पडतोच आणि सुखी संसाराला ग्रहण लागतेच ! व वेध लागतात भांडणाचे ! ग्रहण सुटेपर्यंत जीवनाचा अर्धा भाग निघून जातो आणि केसांची बट पांढरी कधी झाली हे त्यांचे त्यांना सुध्दा कळत नाही. या उलट पती-पत्नी, बहीण-भाऊ, सासू-सून, सासरा-सून, सासरा-जावई या नातेसंबंधानंतर इतर, मित्र-मित्र, साहेब-कारकून, मालक-नोकर या सर्व सवंगड्यांचे तेच आहे. दूरदर्शनवरील विविध मालिका हेच दाखवत असतात. त्यात 'तूतू-मैंमैं,' 'कुकुटिकाली,' 'थोडा है थोडेकी जरूरत है' क्योंकी सॉस भी कभी बहूँथी 'सांस' मराठीत ज्या, 'आभाळमाया', 'प्रपंच', 'घरकुल', 'दामिनी', 'एक धागा सुखाचा' हा असा 'इंद्रधनुष्य' या सर्वच मालिकांनी मनासारखा सवंगडी मिळाल्याचे आणि न मिळाल्याने काय दुःख सहन करावे लागते याचे यथार्थ दर्शन प्रेक्षकांना घडवले आहे आणि कुठेना कुठे तरी सामान्य माणसाच्या मनातला धागा पकडण्याचा प्रयत्न करून मालिकेच्या यशात भरच घातली आहे. जुन्या पिढीमध्ये मुलगा ही म्हातारपणाची काठी असते, असे मानत असत. पण ही काठी आता म्हाताऱ्यांनी फेकून देऊन आपली वेगळी चूल मांडून किंवा सधन आईवडिलांनी वृध्दाश्रमाचा आसरा घेतलेला दिसून येतो आहे. तिथेसुध्दा मनासारखा 'रूम-पार्टनर' (सवंगडी) मिळाला पाहिजे नाहीतर एखाद्याला पोथी वाचायची आवड, तर दुसऱ्याला माळ ओढायची, एखाद्याला दूरदर्शन बघण्याची असे निरनिराळे सवंगडी

मिळतात. शेवटी मनातल्या मनात चरफडत देवाला शिव्या देत देत दिवस कंठीत असतात. यातून आपल्या पंतप्रधानांची सुध्दा सुटका झालेली नाही. त्यांनासुध्दा मनासारखे सवंगडी न मिळाल्याने भरपूर शोधाशोध करून कशी कसरत करावी लागते आहे. हे आपण रोजच दूरदर्शनच्या माध्यमातून प्रत्यक्षच पहातो.

कवी शांताराम आठवले यांचे हे गीत म्हणजे जीवनाचा गार्भितार्थ आहे यात शंकाच नाही. फक्त मला एवढेच म्हणावेसे वाटते की या दोन घडीच्या डावाऐवजी तीन घडीचा डाव. ढोबळमानाने म्हणता येईल. पहिली घडी उलगडता युवा अवस्था येते. दुसरी घडी परिटघडीची असते तिची इस्त्री युवापिढी सहसा मोडत नाही. आणि इस्त्री मोडली की तिसरी घडी पडते. ती एकदा का पडली की ती सुरकुतते, विस्कटते, आणि थोडी दबलेली असते तोच वृध्दावस्था सुरू होते. तो तिसऱ्या घडीचा डाव जर फांसे उलटे पडले तर आयुष्याचा जमाखर्च होतो आणि शिलकीचा हिशेब करता करता हातचे उरत जातात आणि मग सगळी बेरीजच चुकते मग कसातरी ताळा जमवून मनुष्य परिस्थितीला सामोरा जातो.

ज्यांना चांगले दान पडते ते सुखी होऊन संसारात मग्न होऊन 'जीवनात ही घडी अशीच राहू दे प्रीतीच्या फुला फुलातूनी वसंत नांदू दे' असे जीवन गाणे म्हणत बसतात.

म्हणून म्हणतो<br>
तीन घडीचा डाव ।<br>
याला जीवन ऐसे नाव ॥

सुरेश देशपांडे<br>
१/२, जान्हवी अपार्टमेंट,<br>
चरई, ठाणे - ४०० ६०१<br>
दूरध्वनी : ५४३ ०११६

•••



नोव्हेंबर हा दिवाळीचा महिना. दिवाळी साजरी करायची तर कशी करायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे. विचारांचे दिवे लावले तर अज्ञानाचा अंधार दूर होईल. पुढच्या वाटा उजळतील.

दिवाळीसाठी म्हणूनच<br>
व्ही. पी. एम्. दिशातर्फे<br>
हार्दिक शुभेछा !

# काळपुळी : जंतुयुद्धातील एक प्रभावी अस्त्र

*गेला ऑक्टोबर महिनाभर काळपुळी (अॅन्थ्रेक्स) वर सर्वत्र चर्चा चालू होती. हा रोग आहे तरी काय? या बद्दल माहिती देणारा लेख. - संपादक*

असे म्हटले जाते की समोरुन चाल करुन येणाऱ्या शत्रुपेक्षा पाठीमागून गुपचूप येऊन वार करणारा फारच घातक असतो. कारण मुळातच तो लढणाऱ्याच्या दृष्टीबाहेर असतो आणि म्हणूनच महाभारत काळापासून अशा प्रकारच्या रणकंदारा दगेबाजी, धोकेबाजी व युद्ध नियमांचे उल्लंघन समजले जात असे. मात्र अशा युद्धात शत्रू लढणाऱ्यास दिसला नसला तरी आजूबाजूंच्या इतरांना दिसण्याची शक्यता असते. याउलट अशा युद्धविषयक नियमांचे उल्लंघन न करताही पाठीमागून अज्ञात पद्धतीने कुणासही न दिसता युद्ध भूमीवर प्रवेश करुन हातात कसलेही शस्त्र न घेता ७२ व ९६ तासातच शत्रूस धरणीवर कायमची चिरनिद्रा देणारे नवीन आधुनिक युद्धतंत्र म्हणजे जंतुयुद्ध होय.

जंतुयुद्धाचा उदय दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सूक्ष्म जीवशास्त्राची प्रगती होत असताना केव्हा झाला हे कुणाच्याच लक्षात आले नाही. मात्र जंतूशी मनुष्य प्राण्याच्या युद्धाची खरी सुरुवात डॉ. फ्लेमिंग यांनी १९२७ सालीच 'पेनिसीलीन' या औषधी तत्त्वाची जंतूपासून निर्मिती करून रोग निर्माण करणाऱ्या जंतूंना मारण्याची योजना प्रथमच यशस्वीरित्या कृतीत आणून केली व औषधशास्त्रातील प्रतिष्ठित 'नोबेल' ही पटकावले. थोडक्यात त्यांनी जंतूंच्या आपपसातील जीव घेण्या भांडणाचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी करून घेतला. आता मात्र आधुनिक युद्ध प्रणालीमध्ये याच रोग जंतूंचा वापर मानवाच्या विनाशासाठी करून घेतला जात आहे. काय आहे हे जंतु युद्ध ?

जंतुयुद्ध म्हणजेच जंतूंचा अस्त्र म्हणून वापर करुन खेळलेले युद्ध. हे अस्त्र हातात धरले जात नाही म्हणूनच त्याला 'शस्त्र विना हस्त' म्हटले जाते. हे अस्त्र डोळ्यांना दिसत नाही व सैनिक आणि सामान्य नागरिक असा फरकही करत नाही. या अस्त्रामध्ये मनुष्य व त्याच्या संपर्कातील पाळीव प्राणी आणि वनस्पती यांचा नाश करणारे रोगजंतू ठासून भरलेले असतात. आपण म्हणाल या अस्त्र निर्मितीचा खर्च प्रचंड असणार, मुळीच नाही. याचा अर्थ अंदाजे रुपयातील एक पैसा एवढाच असण्याची शक्यता आहे. कोट्यावधी रुपयांचा एक रणगाडा जर अंदाजे शंभरच्या आसपास शत्रू सैनिक एका वेळी मारू शकत असले तर एक जंतुयुद्ध गरीब, मागासलेल्या राष्ट्रातील हजारो सैनिक व नागरिकांना उपचाराविना अल्प कालावधीत मृत करू शकते आणि त्यास कारण आहे या रोग जंतूंची व्याप्ती व लागण. आधुनिक, परंपरागत युद्ध शास्त्रात सैनिक, सैनिकी स्थळे यांना महत्त्व दिले जाते व नागरिक आणि त्यांच्या संपर्कातील संस्था (रुग्णालये, शाळा इ.) यांना धक्काही लावला जात नाही. (काही अपवाद वगळता) मात्र जंतुयुद्ध असा भेदभाव करत नाही. उलट नागरिकांना मुद्दाम यात खेचण्याचा प्रयत्न करते.

जंतुयुद्ध ही प्रामुख्याने तीन मुख्य उद्दिष्टे समोर ठेऊन लढले जाते. यामध्ये १) शत्रू राष्ट्रातील प्रत्येक व्यक्ती ही शत्रू म्हणून समजली जाते. २) सामान्य नागरिकांना मुद्दाम लक्ष ठेवून शत्रू राष्ट्राचे लक्ष युद्धभूमिवरुन विचलित करण्याचा प्रयत्न केला जातो. ३) शत्रुराष्ट्राचे मनुष्यधन, पशुधन, अन्न, पाणी व आवश्यक वनस्पती यांचा अप्रत्यक्ष

नाश करण्यावर प्रामुख्याने भर दिला जातो. त्यामुळे राष्ट्राची आर्थिक, राजकीय कोंडी होऊ शकते व आपाडी युद्धास अंतस्थ विरोधही वाढू शकतो.

जंतुयुद्धात मुद्दाम तयार केलेली जंतू असे हवा, पाणी व अन्न या माध्यमातून शत्रू राष्ट्रात प्रसरित केली जातात. या तिन्हीही माध्यमापेक्षा हवा या प्रभावी माध्यमाचा सध्या जास्त परिणामकरित्या वापर होत आहे. कारण अन्न व पाणी माध्यमावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य आहे. मात्र हवेवर कसे नियंत्रण ठेवणार ? याच हवेच्या माध्यमातून सध्या कार्यरत असलेले एक अतिशय प्रभावशाली जंतुअस्त्र म्हणजे काळपुळी (अँथ्रॅक्स). याच अस्त्राची चर्चा सध्या प्रसिद्धी माध्यमातून जोरात सुरु आहे. अमेरिकेत याचे आजमितीस २९ रोगी आढळले आहेत व 'द सन' या दैनिकाने छायाचित्रकार बॉब स्टेव्हन्स यांचा ५ ऑक्टोबरला झालेला मृत्यूही काळपुळी हुंगल्यामुळेच झाला होता. अमेरिकेत गेल्या २० वर्षात झालेली ही पहिलीच दुर्दैवी घटना.

### काय आहे काळपुळी ?

काळपुळी हा श्वसनाशी निगडित असलेला रोग आहे. लक्षणे जवळपास न्युमोनिया सारखीच. मात्र न्युमोनिया नाही. या रोगास कारणीभूत असलेल्या जंतूस बॅसिलस अँन्थ्रॅसीस या नावाने संबोधले जाते. १८५० साली या जंतूंचा शोध एका मेंढीच्या माध्यमातून लागला व १८७० साली त्याच्या रोग लक्षणावर विशेष अभ्यास झाला. हा जंतू आकाराने अत्यंत सूक्ष्म, लहान काठी सारखा आहे. थोडक्यात दह्यामध्ये आढळणाऱ्या उपयोगी जंतूच्या आकाराशी त्याचे बरेच साम्य आहे. मात्र त्याचे एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे ४८ तासांच्या वाढीनंतर लगेचच या जंतूचे लहान गोलाकार कणांमध्ये (spore) रुपांतर होण्यास सुरुवात होते. हे कण स्थितप्रज्ञ अवस्थेत ५०-६० वर्षे राहू शकतात. मातीमध्ये त्यांचे वास्तव्य खूप असते. त्यांच्यावर उकळते पाणी, तीव्र तपमान यांचा ठराविक कालावधीसाठी काहीही परिणाम होत नाही. मात्र त्यांना योग्य वातावरण मिळाले की या कणांचे रुजन होते व त्यातून नवीन जंतू बाहेर पडतात. या जंतूपासून अल्पावधीत लाखो जंतू तयार होतात.

काळपुळी या रोगाचे प्राबल्य गुरांचे कळप, पाळीव प्राण्यांचे वास्तव्य असलेल्या जागा या ठिकाणी जास्त असते. मध्यंतरी क्युबामध्ये पाळीव डुकरांची संख्या अचानक मोठ्या प्रमाणावर घटली होती. तेव्हा त्या राष्ट्राने अमेरिकेवर काळपुळी वापराचा आरोप केला होता.

काळपुळीचे कण गोलाकार व वजनास हलके असल्याने त्यांचा हवेच्या माध्यमातून फार वेगाने प्रसार होतो. हे कण श्वसनाच्या मार्गातून फुफ्फुसात व नंतर रक्तात प्रवेश करतात. मानवी रक्तात त्यांना आवश्यक ते पोषक वातावरण मिळाल्याने हे कण लगेच रुजतात व त्यातून जंतूंची निर्मिती होते. २४ तासानंतर रक्त तपासणी केल्यास रक्तात या रोगाचे बरेच जंतू आढळतात. हे जंतू रक्तामध्ये विषारी द्रव्ये सोडतात. (exotoxins, factor I, II, III) थोडक्यात काळपुळीचे कण व जंतू म्हणजे विष भरलेल्या कुप्याच असतात. माणसाच्या श्वसनातून फुफ्फुसाद्वारे रक्तात प्रवेश करताच या कुप्या उघडतात व रक्त विषारी होण्यास सुरुवात होते व त्याचा पहिला परिणाम श्वसन संस्थेवरच होतो. त्यामुळे ताप, कोरडा खोकला, अशक्तपणा, श्वासोच्छ्वासात अडथळे हे परिणाम लगेच जाणवू लागतात व ४८ तासांत योग्य उपचार न झाल्यास मृत्यू अटळ असतो. आजारी रुग्णाच्या श्वासोच्छ्वासातून आजुबाजूची हवा प्रदुषित होते व रोगाचा प्रसार तेवढ्याच वेगाने होतो. रोग झालेल्या पाळीव प्राण्याचा संपर्क अथवा मांस खाण्यात आल्यावरही मनुष्यास हा रोग होण्याची शक्यता असते.

जंतुयुद्धाचे हे प्रभावी अस्त्र तयार करण्यास खर्च फार येत नाही. एक छोटी आधुनिक सूक्ष्मजीव प्रयोगशाळा व सूक्ष्मजिवशास्त्रज्ञ या दोन गोष्टी आवश्यक. सूक्ष्मजीव वाढीसाठी आवश्यक असलेल्या खास पण अतिशय साध्या अन्नावर, काचेच्या विशिष्ट गोलाकार पेटीत ४८ तासात या जंतूंची वाढ प्रचंड मोठ्या प्रमाणात होते. नंतर ठराविक विशिष्ट उपचार पद्धती वापरुन त्यांचे रुपांतर कणांमध्ये केले जाते व प्रयोगशाळेत तयार केलेले हे काळपुळीच्या जंतूचे कण लहान कॅप्सुल सदृश बॉम्बमध्ये भुकटीच्या सहाय्याने काळजीपूर्वक भरले जातात व शत्रुप्रदेशात हवाई मार्गाने दाट वस्तीत व गुरांच्या कळपावर सोडले जातात. जमिनीपासून एका ठराविक अंतरावर आल्यावर या कॅप्सुल अथवा बॉम्ब लहानशा धक्क्याने फुटतात व जंतूंचे कण हवेत सर्वत्र पसरतात. बॉम्बच्या लहानशा स्फोटातून निर्माण होणारी कणांच्या मार्गात बरेचदा अडथळा निर्माण करते. शत्रू राष्ट्र युद्ध निर्मितीमध्ये प्रगत असल्यास हवाई पद्धत ही योग्य ठरत नाही. अशावेळी टपाल पद्धती सारख्या सुरक्षित, हमखास परिणामकारक अशा मार्गाचा वापर करण्यात येतो. या पद्धतीत पाकिटात घातलेल्या पत्रावर जंतूंच्या कणांचा हलका थर देणे, पत्रास मुद्दाम सुगंधित करुन त्यावर कण पेरणे जेणेकरुन प्राप्तकर्ता पाकिट उघडल्यावर पत्राचा वास घेण्यास प्रवृत्त होईल व कणांना आपल्या शरीरात आमंत्रित करेल. तसेच पत्राची घडी उघडतांना घडीत ठेवलेले कण हवेत उडणे अथवा भुकटीच्या रुपातही हे कण पाठवले जाणे असे विविध मार्ग वापरले जातात. भुकटी हुंगली असता हलके कण लगेच श्वासातून पत्र प्राप्तकर्त्याच्या फुफ्फुसात जातात व भुकटी मागे तशीच राहते. अंदाजे २४ तासात रोगाची लागण पूर्ण होते. टपालमार्गे येणारी जंतू अस्त्रे हे शत्रुराष्ट्राच्या अर्थ व संरक्षण व्यवस्थेत मोलाचा वाटा उचलणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना लक्ष ठेऊन वापरली जातात. हजारो लाखोंच्या ढिगाऱ्यातून अशी वैयक्तिक पत्रे शोधणे अशक्यप्राय काम असते.

काळपुळी, प्रतिजैविके देऊन नियंत्रणाखाली आणता येते. मात्र रोगाची लक्षणे लक्षात आली तरच. लसीकरण देऊनही यावर नियंत्रण ठेवता येते. पण ही फार खर्चिक बाब आहे व त्यास मनुष्य निरोगी हवा. काळपुळीचे रक्तात पसरलेले विष पातळ कसे करता येईल तसेच काळपुळीस विष तयार करण्यापासूनच परावृत्त कसे करता येईल यावर अमेरिकन शास्त्रज्ञांचे हारवर्ड, मिशगिन व डुक विद्यापीठात जैविक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जोरदार प्रयत्न चालू आहेत. या संबंधीचे उंदरावर झालेले प्रयोग यशस्वी ठरले आहेत. डॉ. आर. जॉन कोलीयर यांचा यात पुढाकार आहे.

काळपुळीचे जैविकयुद्धतंत्राद्वारे होणारे आक्रमण गरीब मागासलेल्या देशासाठी अतिशय संहारक ठरू शकते. केवळ बलाढ्य, श्रीमंत व लोकसंख्या नियंत्रित असलेली राष्ट्रेच असे जंतुयुद्ध जिंकू शकतात. कारण त्यांची तयारी फार पूर्वीपासूनच असते. एक मात्र सत्य गोष्ट आहे की युद्धात कमकुवत असेलेली राष्ट्रेच या अस्त्राचा वापर बलाढ्य देशाविरुद्ध करतात.

थोडक्यात हल्ला होण्याअगोदर पाठीमागे अचानक वळून शत्रूचा हात धरणे तयारीनिशी सोपे आहे मात्र सशस्त्र असूनही मागे पुढे आजुबाजूस काळपुळी सारख्या अज्ञात शत्रूने तुम्हास वेढले असेल तर आधुनिक शस्त्र धारण केलेले हात गळून पडले, नाही तरच आश्चर्य.

**डॉ. नागेश टेकाळे**

डॉक्टर्स कार्टर, बिल्डींग क्र. 3/IV/18

इ.एस.आय.एस. रुग्णालय, मुलुंड (प) ४०० ०८०.

फोन : निवास : ५६४ ६८७९.

e-mail : nstekale@rediffmail.com

• • •

# एक श्रद्धांजली

"बाळू पुरवण्या...." "बाळू रिफिल....." "बाळू .... बाळू......" पु.लं.च्या नारायण सारखीच आमच्या बाळूची अवस्था होती. फरक इतकाच पु.लं. चा नारायण शेवटी मंडपात एकटाच राहिला होता आणि आमचा बाळू मात्र एकटाच मंडप सोडून गेलाय.



१५ जून १९८३ पासून बाळू शिपाई म्हणून शाळेच्या सेवेत होता. सदा हसतमुख, कष्टाळू आणि कर्तव्यतत्पर. पेपर तपासताना दुसरी रिफिल मागितली तर बाळू हसत हसत म्हणायचा, 'पहिली संपली का बघू?' आम्ही म्हणायचो 'बाळू पहिली संपल्याशिवाय आम्ही दुसरी कशाला मागू ? अगदी स्वतःच्या खिशातून जात असल्यासारखी बोलतोएस' पण खरचं ! शाळेला एकदा आपलीच मानल्यावर शाळेची स्टेशनरी वाया घालवणं त्याला मान्य नव्हतं.

कोल्हटकर मॅडमचा तर बाळू म्हणजे उजवा हातच. त्यामुळे त्याच्या जाण्याचं सत्य स्वीकारणं मॅडमना खूप कठीण जातंय. सगळी शाळाच सुनी सुनी वाटते आहे. आज दहा दिवसांनीही बाळू बद्दल लिहायचं आहे असं मला सांगताना त्यांना अश्रू आवरत नव्हते. शाळेचं कुठलंही जबाबदारीचे काम बाळूवर विश्वासाने सोपवावं त्याने नीट पार पाडलयं म्हणून. समजा, बोर्डाच्या ऑफिसमध्ये जायचं असो किंवा एस्.एस्.सी. चा रिझल्ट आणण्यासाठी मेन सेंटरवर जायचं असो, भल्या पहाटे उठून बाळू तिथे पहिला नंबर लावायचा. रोज सकाळी सात वाजता शाळेत आल्याबरोबर उदबत्तीचा दरवळ जाणवायला कारण आमच्या आधी शाळेत येऊन सर्व देवाच्या फोटोंना बाळूने हार घालणं आणि उदबत्ती ओवाळणं चालू असायचं. अत्यंत भाविक, पंढरपूरचा वारकरी, नेमकं ह्याच वर्षी त्याला विठोबाचं दर्शन नीट झालं नव्हतं म्हणून खंत व्यक्त करत होता तो तरीही श्रद्धेचे स्तोम नव्हतं.

आमची शाळा म्हणजे एका मोठ्या कुटुंबासारखीच आहे. त्यामुळे आमच्या ह्या कुटुंबातील एका सदस्याचं असं हे अचानक जाणं सर्वांनाच चटका लावून गेलयं. शिपाई वर्गाचं बाळूवर सख्ख्याभावापेक्षा जास्त प्रेम होतं. त्यांचा भावासारखा मित्र गेलाय. विद्यार्थ्यांचा लाडका बाळूकाका गेलाय. आपल्या वैयक्तिक आयुष्यातही बाळूने नातलगांसाठी खूप काही केलयं. सतत कष्ट करुन वर येण्याची जिद्द.

बाळूचा जन्म १ जून १९६५चा आणि मृत्यू ११ ऑक्टोबर २००१ म्हणजे उणंपुरं ३६ वर्षांच आयुष्य. बाळू अनेक वेळा मॅडमचा निरोप घेऊन यायचा 'गेलात तरी चालेल' पण अचानक असा कसा गेला हा ! मृत्यूचा अधिकार आपण सर्वांनीच मान्य केलाय पण म्हणून काय त्यानं असं केव्हाही यावं आणि कोणालाही उचलून न्यावं?

शाळेने असा हा विश्वासू, कष्टाळू, निर्व्यसनी, सदा हसतमुख सेवक कायमचा गमावला आहे. त्याची उणीव अर्थातच भरुन न निघणारी आहे.

'ईश्वर त्याच्या आत्म्यास शांती देवो !'

**मैत्रेयी शेवडे**
सी. ए. के. जोशी स्कूल, ठाणे.

• • •

# युत्या, आघाड्या आणि राजीनामे

*ठाण्यातील कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेत पदवी गटात प्रथम क्रमांकाचा मान मिळालेल हे भाषण आहे. विशेष म्हणजे प्रशांत देशमुख यांनी प्रथम क्रमांक मिळविण्याच्या जिद्दीने लागोपाठ तीन वर्षे स्पर्धेत भाग घेऊन प्रयत्न केला होता. - संपादक*

एकदा एक गलेलठ्ठ बोका, एका मोकळ्या मैदानावर एक उंदराच्या पाठीमागे लागतो. उंदीर बिचारा घाबरून जीव मुठीत घेऊन पळतो. तेवढ्यात उंदराला एक बीळ दिसते त्या बिळात उंदीर जाऊन लपून बसतो. एकाच मिनिटानंतर त्याला बाहेर कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज ऐकायला येतो. आता मात्र उंदराला आतून आनंदाच्या उकळ्या फुटायला लागतात. आता कुत्रा, बोक्याच्या पाठीमागे लागला असेल असं समजून ही मजा पाहण्यासाठी उंदीर बिनधास्तपणे बीळाच्या बाहेर निघतो. तो ज्या क्षणाला बाहेर येतो त्याच क्षणाला बोका उंदराला पंजात पकडतो. उंदीर आश्चर्यचकित होऊन विचारतो. कुत्रा इथे असताना, तू इथे कसा काय आहेस. कुत्र्याचं आणि तुझं तर वैर आहे ना? तेंव्हा बोकोबा जे उत्तर देतो ते या विषयाच्या दृष्टीने अत्यंतिक मार्मिक आहे. बोकोबा म्हणतो, "तुझ्यासारख्या उंदरांची शिकार करण्यासाठी हल्ली, मी आणि कुत्र्याने युती केलेली आहे".

खरोखरीच ज्या राजकारणात सध्या बोकोबाची आणि कुत्र्याची युती होते. त्या ठिकाणी सामान्य जनतेने अगदी त्या उंदरासारखं घरातच राहण्याचा निश्चय केला तर त्यात चुकी कोणाची ? आणि ही जनता एखाद्या वाईट प्रवृत्तीला विरोध करण्यासाठी कुठल्यातरी पक्षावर किंवा नेतृत्वार विश्वास ठेऊन रस्त्यावर येते त्यावेळेस तिने ज्यांच्यावर विश्वास ठेवला आहे आणि ज्यांच्या विरोधात आहे त्यांची दोघांची मात्र आतुन युती झालेली आहे असं जेंव्हा जनतेच्या लक्षात येते तेंव्हा मात्र जनतेच्या पदरी निराशाच पडते.

युत्या, आघाड्या आणि राजीनामे या विषयाचा विचार केला तर यापूर्वी टिळक आणि आगरकर या दोन विचारांची ती युतीच होती. राष्ट्रीय सभा म्हणजे इंग्रजांच्या जुलुमशाहीविरूद्ध उघडलेली आघाडीच होती, आणि त्या काळात लालबहादुर शास्त्रींनी रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्विकारून दिला तो देखील राजीनामाच होता आणि डॉ. सी.डी. देशमुखांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनावरून दिला तोही राजीनामाच होता म्हणजे युत्या, आघाड्या त्या काळातही होत होत्या, राजीनामेही दिले जात होते आणि आजही युत्या, आघाड्या होतात आणि राजीनामे दिले जातात. पण आजच हा विषय चर्चिला जाण्याचं कारण या त्या काळात हे सर्व म्हणजे युत्या व्हायच्या त्या तत्त्वांसाठीच, आघाड्या उघडल्या गेल्या त्याही तत्त्वांसाठीच आणि राजीनामे दिले गेले तेही तत्त्वांसाठीच. आज हे सर्व तत्त्वांसाठी न होता सत्तेसाठी होत आहे हाच त्यातला फरक. आणि हेच जनतेसाठी घातक आहे.

ज्यावेळेस एखाद्या मंत्र्याचा राजीनामा दिला जातो त्यावेळेस सामान्य जनतेसाठी त्याने ते पद सोडले एवढाच अर्थ मर्यादित असतो. पण खरं तर त्या राजीनाम्यावर राजकारणाची अनेक गणितं जुळत असतात, फिस्कटत असतात. राजीनाम्यांच्या माध्यमातून अनेक चाली खेळल्या जातात हे मात्र सामान्य जनतेच्या लक्षात येत नाही. आणि त्यांच्या लक्षात आणून देणारी कुठली व्यवस्थाही नाही. पण जर खरंच या राजीनाम्यांपाठीमागे

किती राजकारण असतं हे जर जाणून घ्यायचं असेल तर अरुण साधूंचा 'सिंहासन' हा चित्रपट पहावा. म्हणजे विश्वासराव दाभाडेंच्या राजीनाम्या पाठीमागे काय इतिहास होता, हे लक्षात येईल.

राजीनाम्याचे अनेक प्रकार आहेत. एकतर नैतिक जबाबदारी स्वीकारुन राजीनामा दिला जातो. (सध्या हा प्रकार लोकांना पहायला मिळत नाही.) दुसरा प्रकार आघाडी सरकार पाडण्यासाठी राजीनाम्याचा वापर केला जातो. म्हणजे हे कसं रंगमंचावर एखाद नाटक चाललेलं असावं. समोर प्रेक्षक बसलेले आहेत पण जो पडदा आहे त्याची दोरी मात्र अशा एका माणसाच्या हातात आहे, जो सारखा त्या रंगमंचावरच्या पात्रांना सांगतोय तुम्ही जर मी सांगाल तसं वागला नाहीत तर दोरी ओढेन. त्याने दोरी ओढली की नाटक संपलं. आघाडी सरकारमध्ये, त्याच्या पाठीमागे आमदार, खासदारांचा गट आहे तो दोरी ओढणाऱ्या माणसाची भूमिका बजावतो. राजीनाम्याची धमकी देतो. राजीनाम्याच्या धमकीने आघाडी सरकारातील घटक पक्षांना ताळ्यावर आणण्यासाठी सुद्धा राजीनाम्याचा धमकी म्हणून वापर केला जाऊ शकतो हे मध्यंतरी अटलबिहारी वाजपेयींनी दाखवून दिलेच.

मुळात आतापर्यंत किती साली कोणत्या युत्या, आघाड्या झाल्या हा इतिहास मी तुम्हाला सांगत नाही ते तुम्हाला माहीत आहेच. पण युत्या, आघाड्या आणि राजीनाम्याच्या सत्रातून हा जो सध्या गोंधळ निर्माण झालाय त्यावर उपाय काय? याचा विचार आपण करु या.

पहिल्यांदा एका टोकाचा विचार समोर येतो की मग लोकशाहीच नाकारायची का ? पण मला असं वाटतं एखाद्या व्यवस्थेला दोष देणं सोपं आहे, पण तिच्याजागी तिच्यापेक्षा यशस्वी ठरणारी दुसरी व्यवस्था निर्माण करणे ही कठीण गोष्ट आहे. आणि आपण लोकशाहीचा प्रवास आतापर्यंतचा चांगलाच केलेला आहे. आपल्याकडे पाकिस्तानामध्ये असे लष्करशहा परवेझ मुशर्रफ यांनी लष्कराच्या ताकदीवर नवाज शरीफांना पदावरून हटवले म्हणजे एकप्रकारे राजीनामा द्यायलाच लावला. अशा पद्धतीचा राजीनामा आपल्याकडे द्यावा लागला नाही यातच आपल्या लोकशाहीचं महत्त्व लक्षात येईल. म्हणून लोकशाहीला दूर सारायचं हा टोकाचा विचार आपण सोडून देऊ.

मग लोकशाहीत युत्या आणि आघाड्याच होणार नाहीत असं काही करता येईल का? तर आजच्या परिस्थितीत युत्या, आणि आघाड्या अपरिहार्य आहेत. मग आमच्या हातात हेच आहे की सध्याच्या राजकारणात, युत्या आणि आघाड्या तत्त्वासाठी कशा होतील आणि त्याचा जनतेला कसा फायदा होईल याचा विचार करणे. यावर मी अब्राहम लिंकननी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणाची आठवण करुन देईन ते म्हणाले होते " आज मी देशाच्या सर्वोच्च पदावर आहे. आणि मी जरी तुमचं वाईट करायचं ठरविलं तरीपण जोपर्यंत तुम्ही स्वतःशी आणि घटनेशी प्रामाणिक असाल तो पर्यंत मी तुमचं फारस वाईट करु शकणार नाही." त्याचपद्धतीने भारतीय जनतेने आज स्वतःशी आणि घटनेशी प्रामाणिक राहणे आवश्यक आहे.

आज राजकारणात युत्या, आघाड्या आणि राजीनामे तत्त्वांसाठी हव्या असतील, तर चांगल्या माणसांना निवडून देणे योग्य रितीने वापरणे आवश्यक आहे. पण आज अशीही परिस्थिती आहे की, लोकांच्यासमोर निवडून देण्यासाठी चांगले पर्याय नसतात. त्यावर उत्तर म्हणजे केवळ काठावर राहून राजकारणाला आणि राजकीय व्यक्तींना शिव्या देण्यापेक्षा किंवा चांगले पर्याय नाहीत म्हणून आरडाओरड करण्यापेक्षा चांगल्या माणसांनी स्वतःला राजकारणात झोकून देऊन लोकांच्यासमोर चांगले पर्याय म्हणून येणे आवश्यक आहे. तुम्ही म्हणाल

राजकारणाबद्दल व्यासपीठावरून बोलणं, किंवा लिहिणं सोपं आहे. पण प्रत्यक्ष राजकारणात या, म्हणजे राजकारणातल्या तडजोडी, आपोआप मान्य करायला लागाल. हे मान्य आहे की आजच राजकारण अतिशय हीन पातळीवर गेलेलं असलं, किती भ्रष्ट झालं असलं तरीही देशाचीं उत्थानांची ताकद याच राजकारणात आहे. म्हणून या ठिकाणी मी म्हणेन आजच्या परिस्थितीत नानी पालखीवाला यांच्या We the people या पुस्तकातील पुढील वाक्ये लक्षात ठेवावीत.

* वाऱ्यावर नियंत्रण ठेवता येत नाही, म्हणून जहाज सोडून देऊ नका.
* काहीही न करता यशस्वी होण्यापेक्षा काही तरी करून अयशस्वी होणे अधिक चांगले
* भारतीय राजकारणात नैतिकतेचा पुनर्जन्म होण्यासाठी बराच कालावधी लागणार असला तरी त्यासाठी जीवन समर्पित करावे यासारखे दुसरे महान कार्य नव्हे.
* चांगल्या पक्षातील चुकीच्या माणसाला निवडून देण्यापेक्षा, चुकीच्या पक्षातील चांगला माणूस निवडून देणे कधीही योग्यच.

अशा पद्धतीने आम्ही जर वागलो तर नक्कीच राजकारणातल्या युत्या, आघाड्या या तत्वांसाठीच होतील आणि राजीनामेसुद्धा तत्त्वांसाठीच दिले जातील. एका कवीच्या शब्दांत सांगायचे झाले तर.

अजूनही मला पहाटेची स्वप्न पडताहेत
एवढ्याशा अंधाराने मी निराश नाही
अजूनही मला वसंताची चाहूल लागत आहे
एवढ्याशा पानझडीने मी हताश नाही
रखरखणारे उन्हाळे असे येतातच अधुनमधून
ढग बरसतीलच असं नाही
अस्ताव्यस्त गवत थोडे वाढले आहे
अंगणातील तुळस अजून वाळली नाही

भारतीय जनतेच्या मनातील ही नैतिकतेची, सुसंस्कृतपणाची तुळस जर आपल्याला जिवंत ठेवता आली तर नक्कीच, युत्या आघाड्या राजीनामे आमच्यासाठी हितकारक ठरतील.

**प्रशांत देशमुख**
पोस्ट ऑफिस, कळंबोली,
पनवेल- रायगड-४१०२१८
फोन नं.: ०२११२-७२३३२

•••

दिशाचे वर्गणीदार व्हा.
संपर्क : ५४२६२७०



# एकतर्फी प्रेम आणि हिंसा

*बांदोडकर महाविद्यालयातील सृष्टी अंकोलेकर ने हा निबंध रत्नागिरीच्या विकास सहयोग प्रतिष्ठान आणि विकास अनुभव केंद्र यांनी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेसाठी पाठविला होता. तिला या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. दिशाच्या वाचकांसाठी हा निबंध प्रकाशित करीत आहे. - संपादक*



सृष्टी अंकोलीकर

प्रेम ...... अवघ्या स्वर्गानंदाचे वर्णन करणारा दोन अक्षरी शब्द. मनातल्या सुप्त आकर्षणाला, हृदयातील नाजुक भावनेला व्यक्त करण्याचे सामर्थ्य असलेल्या एकमेव शब्द. प्रेम कुणाचेही कुणावरही असू शकते. आई वडिलांवर, भावंडावर, मित्र मैत्रिणींवर, इतकचे नव्हे तर निसर्गावर देखील प्रेम असू शकते. पण सध्या प्रेमाचा अर्थ घेतला जातो तरूण तरूणींतील परस्पर आकर्षण. एखादी युवती एखाद्या युवकाबरोबर मोकळे पणाने वागत असेल, बाहेर जात असले तर त्या दोघांत काही तरी भानगड आहे असा शिक्का मारून मोकळे होणाऱ्या आजच्या समाजात एकतर्फी प्रेमाने धुमाकूळ घातला आहे.

प्रेमाची भावना मनात नकळत उमटत असते. कधी प्रदीर्घ काळाच्या परिचयानंतर समजलेल्या गुणांमुळे तर कधी पहिल्या भेटीत प्रेमात पडणारे प्रेमवीर समाजात आहेत. प्रेमाच्या या शुद्ध स्वरूपाचे विडंबन केले आहे एकतर्फी प्रेमाने. रस्त्यावरून चालताना, दुकानात, बाजारात, कचेरीत, शाळा, महाविद्यालयांत किंवा इतर तत्सम ठिकाणी एखाद्या तरूणीची नजर एखाद्या तरूणीवर पडते अन् तो तिच्यावर प्रेम करू लागतो. तसं पाहिलं तर यात काहीच चूक नसते. कुठेही अन् कुणावरही होऊ शकते. बरेच दिवस तिच्या पुढे-मागे घुटमळत राहिल्यानंतर तो स्वयंघोषित प्रेमपुजारी आपल्या देवतेकडे प्रेमाची याचना करतो. पण सध्या मात्र याचना करण्याचे दिवस मागे पडले आहे. स्वयंघोषित प्रेमपुजारी आता प्रेमपुजारी राहिला नसून तो चक्क प्रेमाची खंडणी मागणारा खंडणी बहाद्दर बनला आहे. ती आता प्रेमदेवता राहिली नसून असहाय्य बनली आहे. त्या खंडणीबहाद्दराला ती नकार देऊ शकत नाही. कारण एकच..... त्याच्या धाडसाचे, स्पष्टवक्तेपणाचे तिला कौतुक वाटते, असे नाही, तिचे मनापासून त्याचावर प्रेम असते, नाही, प्रत्येक वेळी असे असतेच असे नाही .... तर कारण एवढेच की, आपला नकार तो सहन करणार नाही याची तिला खोल जाणीव असते. तो आपली बदनामी करेल, येता-जाता छेडछाड करेल, हिंसक मार्गाने काटा काढेल. पण आपल्या मदतीला कुणीच येणार नाही याची तिला खात्री असते. म्हणून तिला आपले प्रेम त्याच्याप्रती अर्पण करावेच लागते. आणि ते कर्तव्य ती बऱ्याच वेळा पार पाडताना दिसते, नव्हे तिला तसे सहन करावेच लागते. काही वेळा तर ती स्वतःच्या भावनांशी बेईमानी करून त्याच्यावर प्रेम करते, फक्त त्याचा दरारा लक्षात घेऊन.

प्रेमाच्या अशा व्यवहारिक वृत्तीला छेद देऊन एखादी मुलगी बंडखोरी करू पाहते. त्यानंतरचे भीषण

परिणाम तिला माहीत असतात. आगामी काळात होऊ घातलेल्या घडामोडी तिनेही पडताळून पाहिलेल्या असतात. तरीही तिला या प्रस्थापित व्यवहाराला प्रेमाची खंडणी मागणाऱ्याला - विरोध करावासा वाटतो. कारण ... एकतर तिने आपल्या निष्ठा दुसऱ्या कुणालातरी वाहिलेल्या असतात किंवा तिच्या दृष्टीने तिने प्रेम करावे असे त्याच्यात काहीच नसते किंवा आजच्या पाश्चात्य संस्कृतीचा उदो उदो करणाऱ्या समाजात सुध्दा तिने आपले शील जपलेले असते. असे अनैतिक संबंध तिला मान्य नसतात. किंवा अशा सारख्या काही कारणामुळे ती त्याला नकार देते. तसं पाहिल तर हा वैयक्तिक प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर हा वैयक्तिक अधिकार आहे. हा अधिकार हिरावून घेणे कुणालाही शक्य नसते. कारण एखाद्या व्यक्तीच्या मनाविरूध्द प्रेम आपल्याकडे वळवले तर ते राहत नाही, तो तिच्या 'मनावर झालेल्या बलात्कार असतो'. बळाच्या जोरावर गुलाम बनवता येते. पण प्रेम मिळवता येत नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. त्या मुलीचा नकार सहन करणारा तो पुरुषांत गणला जाणार नाही, असाच त्याचा समज असावा. एक मुलगी आपल्याला नकार देत हे त्याच्या पुरुषी अहंकाराला सहन होत नाही. असा नकार सहन करणे म्हणजे नामर्दपणा वाटतो.

हातात बांगड्या, मानेवर केस, कानात बाळी, इत्यादी चाळे करू शकणारा तरुण, मुलीचा नकार सहन करणे बायकीपणाचे मानतो या सारखा विरोधाभास नाही. मर्दपणा दाखविण्यासाठी प्रतिष्ठेची अनेक क्षेत्रे खुणवीत असतात, एखाद्या तरुण स्त्रीच्या असाह्य स्थितीचा फायदा घेऊन तिचे प्रेम संपादन करण्यासाठी तिच्यावर जबरदस्ती करतो, हा सारा प्रकार हास्यस्पदच म्हणावा लागेल. मर्दपणा गाजविण्यासाठी दुबळ्या घटकांचा नामोहरम करण्याचा मूर्खपणा फक्त आजच्या काळातच होऊ शकतो. पुरुषी सामर्थ्याचे असे विडबंन फक्त आजची विशेषतः तरुण पिढीच करु शकते. स्त्रीवर अधिकार गाजविणे म्हणजे पुरुषार्थ असा अर्थ फक्त आणि फक्त आजच्या शब्दकोशात लावला जाऊ शकतो. कारण ...... कारण एकच आहे. आता नैतिकता नावाची चिजवस्तू उरलीच नाही. उदात्त सांस्कृतिक ठेवा दूर सारुन तरुणवर्ग चंगळवादी, भोगवादी, संस्कृतीकडे झेपावला आहे. लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी यांचे आदर्श लोकांच्या नजरे आड झाले आहेत. इंग्लंड- अमेरिकेच्या अनुकरण करणाऱ्या, आयात वस्तू वापरण्यात अभिमान बाळगणाऱ्या आजच्या समाजाला आदर्श वाटतात. व्हेलेंटाईन, डायना आणि इतर पाश्चात्य प्रेमवीर. संत तुलसीदासाचे प्रेम त्यांच्या दृष्टीने कवडीमोलाचे आहे. कारण पत्नीवर प्रेम करायचे असते ते फक्त ती समोर असताना, तिच्या नजरेआड एखाद्या रूपसुंदरीला नेत्रकटाक्षांनी वश करायचे असते, अशीच आजच्या समाजाची धारणा आहे.

प्रेमाचे असे विडंबन करणारा आजचा तरुण वर्ग तरुणीचा नकार पचवू शकत नाही. तो हर तऱ्हेने तिला नामोहरम करण्याचा प्रयत्न करतो. तिला धमक्या देण्यास सुद्धा तो कमी करत नाही. कारण त्याचे प्रेम हे निरपेक्ष प्रेम नसून असते ती फक्त वासना. वासनेला प्रेम मानणाऱ्या तरुणीला तिच्या होकारासाठी वाटेल ते मार्ग चोखंळण्याचा स्वातंत्र्य कुणी बहाल केले ? हा प्रश्न अनुत्तरीत असला तरी तरुण मात्र या स्वातंत्र्याचा पुरेपुर फायदा करुन घेताना दिसतो. शीलरक्षण, देशरक्षण व विकास नैतिकता इत्यादी कर्तव्ये समोर असताना आपल्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष करुन केवळ तथाकथित हक्क आणि स्वातंत्र्य यांचा उपभोग घेणारा तरुण वर्ग स्त्रीत्व ही स्वतःची अघोषित मालमत्ता समजू लागला आहे. स्त्रीसमानतेमुळे स्त्रीला लाभली ती फक्त कर्तव्यांतील बरोबरी. प्रत्येक क्षेत्रात स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करते. तिला पुरुषाइतकेच वेतन मिळते, पण समाजात तिची किंमत कायम पुरुषाहून कमीच आहे. हक्क तिला मिळाले नाहीत, ही उघड सत्ये आहेत.

प्रेमाची खंडणी मिळविण्याचे मार्ग अयशस्वी झाले तर मात्र परिस्थिती जास्तच चिघळते. या तरुणीला विद्रूप करण्यापासून ते तिचा काटा काढण्यापर्यंत त्याची तयारी असते. आपल्याला न मिळालेले साध्य इतरांनाही मिळू नये यासाठी त्याची हिंसक धडपड सुरु होते. यातून माणुसकीला काळिमा फासणारे अनेक प्रकार घडतात. त्या तरुणीला खोलीत कोंडून जाळले जाते, भररस्त्यात पेटवले जाते किंवा नंगी तलवार आणि तत्सम धारदार शस्त्रे तिचा घात करतात. दाहक ॲसिड तिचा चेहरा विद्रूप करते, तिचे डोळे निकामी होतात, एखादा अवयव कायमचा दुखावतो. पण... पण ती हतबल असते. पोलिस चौकशी झाली तरी काहीच फायदा नसतो. तिचे झालेले नुकसान कुणीच भरुन देऊ शकत नाही. ती जगली तरी तिचे जीवन परावलंबीच होते. आणि या सर्वापेक्षा दाहक म्हणजे समाजाने तिच्यावर केलेले आरोप. पुरुष कधीच चुकत नाही, असाच समाजाचा ग्रह असतो. झाल्या सर्व प्रकाराला ते तिलाच दोषी ठरवतात. शेरेबाजी करतात. तीच तशी वागत होती असे सांगून नावे ठेवतात आणि हेच तिला धगधगत्या ज्वालेपेक्षा दाहक वाटते. ते जिवंत मरण सहन करणे खरोखरच कठीण जाते. यातून मग कित्येक वेळा ती आत्महत्येचा मार्ग स्वीकारते. आजन्म मरण यातना सहन करण्यापेक्षा एकदाच आलेला मृत्यू तिला परम प्रिय वाटतो.

प्रेमाच्या या सर्व अवमूल्यनाला जबाबदार कोण? हा एकमेव प्रश्न घुमत राहतो. चर्चा झडतात-थंडावतात. पण तिचा जीव...... तो तर कधीच निघून गेलेला असतो. प्रेमासाठी त्याग करणारी उदात्त संस्कृती कुठे आणि कुठे ही वासनांधता ? सुसंस्कृत मन बेचैन होते. प्रत्येक आई-वडिलांच्या काळजात धस्स होते. पण प्रत्यक्षात काहीच घडत नाही. मुलांवर सुसंस्कार करणे आईवडिलांना शक्यच नसते. ते ज्या दूरदर्शन संचावर प्रेम करतात तो संच सुद्धा त्यांच्या मुलांवर वाईट परिणाम करत असतो. पण सारे काही जाणून सुद्धा ते हतबल असतात. मुलांनी काय पहावे, काय पाहू नये यावर ते नियंत्रण ठेवू शकत नाही. तसे करणे म्हणजे मुलांचा कोंडमारा असे त्यांना वाटते. तिची हृदयभेदक किंकाळी कुणाच्याही कानावर पडत नाही, असे नाही. सारे काही घडते ते समाजासमोरच पण समाज काहीच करत नाही. ती जळताना तिला विझवायलाही कोणी येत नाही. कुणीही तुमचे वाकडे करु शकणार नाही, असा धीर हिंस्त्र श्वापदांना देण्याचे कार्य समाजाची ही वागणूक करते. उगाच कशाला नसती कटकट ओढवून घ्यावी किंवा कामावर पोहचण्यास उशीर झाला तर पगार कापला जाईल असाच विचार त्याच्या मनात येत असावा. हृदयाच्या जागी दगड ठेवून वागणारी ही मंडळी त्या जळत्या मुलीच्या ऐवजी माझी मुलगी असती तर .... हा साधा विचार सुद्धा करत नाही. म्हणूनच तर हा हिंस्त्रपणा वाढत आहे. समाजाने एकदा विरोध केला, एखाद्या हिंसक तरुणाला त्याच ठिकाणी झोडपले तर पुन्हा कुणीही मुलीच्या वाट्याला जाणार नाही हे निर्विवाद सत्य आहे. पण तो क्षण येईपर्यंत हे असेच आणि असेच चालणार हे वास्तव आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे 'समाजाने स्वतः गंभीर होऊन प्रेमाच्या हिंसक विडंबनाला 'कृतिशील विरोध' केला तर परिस्थिती लगेच सुधारेल. नाहीतर मुलीच्या हृदयावर तिच्या नाजुक भावनांवर -असाच बलात्कार होत राहील. आणि नुसत्या हळहळण्यापलीकडे काहीच होणार नाही.

**सृष्टी शिवानंद अंकोलीकर**

बा.ना. बांदोडकर महाविद्यालय, ठाणे.

• • •

# २१व्या शतकात माहितीचे मूल्य : महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या दृष्टीने


*ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या मागणीनुसार 'माहिती' चे मूल्य वाढत आहे. या वाढत्या मूल्याप्रमाणे येत्या काळात माहिती विकतच घ्यावी लागणार आहे. महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना, लाभार्थींना 'माहिती' ची जास्तीत -जास्त आवश्यकता असते, त्यादृष्टीने कागदविरहित ग्रंथालयाच्या संकल्पनेबरोबरच मुद्रण कलेचा सुद्धा 'माहिती' ह्या मूल्याशी असलेला निकटचा संबंध लक्षात घेऊन या शतकांत माहितीचे मूल्य जपण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालयांना प्रयत्न करुन ही 'माहिती' लाभार्थींपर्यंत पोहचविण्यासाठी उचलाव्या लागणाऱ्या पावलांचा, उपक्रमांचा या अभ्यासनिबंधाच्या निमित्ताने केलेला प्रयत्न. या महिन्यातील ग्रंथालय सप्ताहानिमित्ताने देत आहोत. - संपादक*

आपण आधुनिक काळात वावरत आहे, या परिस्थितीत आपल्या राहणीमानाचे उदाहरण घेता आपण स्वतः व्यक्तिगत राहणीमानातच बदलतो आहे असे नाही. तर आपल्या बरोबर सगळे जगच बदलते आहे मग त्यात ग्रंथालयेच का अपवादात्मक राहतील ? सामाजिक, तांत्रिक आणि मुख्यतः आर्थिक तंत्रज्ञानातील प्रगती ही ग्रंथालयांना आधुनिकतेकडे घेऊन चालली आहे असेच म्हणावे लागेल. यात दररोज होणाऱ्या नवीन घडामोडींचा विचार करता महाविद्यालयीन ग्रंथालयांना सुद्धा मागे राहता येणार नाही. कारण, नफा न कमविता चालविल्या जाणाऱ्या संस्थांच्या कक्षेत मोडणाऱ्या 'ग्रंथालय आणि माहितीकेंद्र' ही संकल्पनाच नवीन सहस्त्रकांत मागे पडत आहे. इतर क्षेत्रांप्रमाणेच ह्या क्षेत्रांत सुद्धा ग्राहकांची काळजी आणि त्यांचे समाधान हाच माहितीसेवा पुरविण्याचा महत्त्वपूर्ण गाभा आहे.

**माहिती : एक आर्थिक पैलू**

अर्थशास्त्रज्ञ आपल्याला ग्राहकांचा संभाव्य दृष्टिकोन समजावून घेण्यासाठी योग्य मार्ग सुचवितात व त्यानुसार नियोजनाची दृष्टी देतात, मर्यादित उत्पन्नाचे स्रोत आणि इतर गरजांमुळे लाभार्थी उपलब्ध माहिती साधनांमधून त्यांचे मूल्यमापन करुन ते खरेदी करण्यासाठी मर्यादित मार्ग उपलब्ध असतात, त्यामधून चांगल्याही निवड करुन उपलब्ध परिस्थितीत चांगला सुधार आणण्यासाठी प्रयत्न करतात.

मागणीचे स्वरुप आणि किंमत यामध्ये संबंध प्रस्थापित करता येऊ शकतो. जर उत्पादनाची किंमत कमी केली तर आपोआपच त्याची मागणी वाढते. हीच वस्तुस्थिती माहिती साधनांच्या बाबतीत सुद्धा खरी ठरते. तीच 'मागणी विश्लेषण' म्हणून ओळखली जाते. त्यामुळे त्याची उत्पादनाच्या व्यापारासाठी मदत होते.




वरील आलेखावरुन माहिती मागणी पुरवठा समतोल लक्षात येईल.

माहितीला आर्थिक मूल्य आहे, कारण एखाद्या देशाजवळ असलेल्या नैसर्गिक डाटा चे रुपांतर तयार वस्तूच्या स्वरुपात करता येते, त्यामुळे तिचा व्यापार होऊ शकतो. तिची निर्मिती होते, ती विकली जाते आणि तिचा उपयोग अनेकजण करतात. या दृष्टिकोनातून विचार करता माहितीची हाताळणी या शतकात एक उद्योगधंदा होऊ शकतो. यामुळे माहितीला मूलभूत मूल्य आहे. तिच्या आधारे जीवनमान सुधारता येते.

प्रा. मोहन पाठक यांनी माहितीच्या मूल्यात घडून येणारे बदल अतिशय सुंदर शब्दांत व्यक्त केले आहेत त्याचा या अभ्यासनिबंधात समावेश करणे महत्त्वाचे वाटते. त्यांच्या मते

" अर्थशास्त्र आणि तद्‌विषयक संकल्पनांमध्ये मूलभूत बदल घडून आला आहे. आजवर अर्थशास्त्रीय पारंपरिक विचार हे ह्या शतकात टिकणे तसे कठीणच. भांडवल, मनुष्यबळ, जमीन इ. पारंपरिक अर्थनिर्मिती घटकांचा विचार आपण आतापर्यंत करत होतो. परंतु आज ही परिस्थिती बदलली आहे. संवेद्य अशा या पारंपरिक घटकांकडून उद्याच्या काय आजच्याच असंवेद्य अशा माहितीप्रधान घटकांकडे आपला प्रगतीचा रोख वळवायला हवा. ज्ञान आणि माहिती यांचाच कच्चा माल वापरुन उद्याच्या उद्योगांमध्ये कामगार समाविष्ट करुन घेतले जातील. अर्थातच कच्च्या मालात मूल्य वाढ करुन पक्का माल बाजारांत आणावा लागेल."

या विवेचनाच्या माध्यमातून आपणाला हाच विचार करावा लागेल की, लहानमोठ्या ग्रंथालयांना त्यांच्या पारंपरिक सेवांमध्ये गुंतून राहणे सध्याच्या काळात तरी परवडणारे नाही. कात टाकावी तशी आपली ध्येयधोरणे बदलून माहितीचा प्रसार व संप्रेषण या दृष्टीने वाचकाभिमुख सेवा देणे गरजेचे ठरणार आहे. यासाठी बरेच वेळा काही महत्त्वपूर्ण बदलही काही वेळा संस्थेला मान्य करावे लागतील. नवीन शैक्षणिक धोरणाबरोबरच पारंपरिक ग्रंथसंस्थेचे अवास्तव कौतुक, त्याच्या ऐतिहासिक वाटचालीचा वर्तमानकाळीतील वास्तव बिसरुन केलेला स्तुतिसंभार या सर्व सवयी बदलून ग्रंथालयांना आपल्या माहितीसेवा वाचकाभिमुख बनवाव्या लागतील व त्यासाठी माहिती हा एक आर्थिक पैलू म्हणूनच २१ व्या शतकात स्वीकारावा लागेल.

**माहिती, तिचा विकास :**

१९८० च्या दूरसंचार क्रांतीनंतर माहिती तंत्रज्ञानात मोठा बदल घडून आला व त्या दृष्टिकोनातून आपण ह्या क्रांतीचा विकास जाणून घेण्यासाठी 'माहिती' म्हणजे नेमके काय व तिच्या संबंधित इ. बाबी लक्षात घेणे आवश्यक ठरेल.

'माहिती' शब्दाचा रोजच्या उपयोगातील नेमका अर्थ काढणे तसे कठीण आहे. परंतु 'माहिती' ही मानवाची निर्मिती आहे. मानवाचे अनुभ निरीक्षण, विचारांची देवघेव आणि प्रलेखांचे वाचन या सर्वांतून निर्माण झालेल्या ओघालाच 'माहिती' असे संबोधिता येईल. **न्यू वेब्स्टर डिक्शनरी ऑफ दि इंग्लिश लँग्वेज'** मध्ये 'वृत्त, बातमी शब्दांतून, मौखिक किंवा लिखित रुपात दिली जाते, वस्तुस्थिती किंवा आकडेवारी वाचून किंवा इतर मार्गांनी मिळविलेले ज्ञान म्हणजे 'माहिती' अशी सर्वसाधारण व्याख्या केली आहे.

२१ व्या शतकांत 'माहितीच्या' मूल्याचा महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या दृष्टिकोनातून विचार करता या महाविद्यालयीन ग्रंथालयांना फक्त त्यांना मिळणाऱ्या अनुदानातूनच ते लाभार्थींच्या गरजा भागविण्यास असमर्थ ठरू शकतात. म्हणून 'माहितीचे मूल्य' जाणण्यासाठी अधिकाधिक कार्यक्षम होण्यासाठी अनुदानाव्यतिरिक्त महाविद्यालयातर्फे चालविल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या

माध्यमातूनच ह्या महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये योग्य असे बदल घडवून आणणे गरजेचे ठरेल. या उपक्रमांच्याच आधारावर या २१व्या शतकांत महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी निश्चितच दुवा ठरेल. जास्तीत-जास्त माहितीसेवा पुरविण्यासाठी प्रयत्नशील असतांना त्या माहितीचे मूल्य पैशांतच मोजावे लागेल. या दृष्टीने महाविद्यालयीन ग्रंथालयांना ह्या शतकांत काही प्रगतीची पावले उचलण्याची कास धरावी लागेल.

माहितीच्या विकासा बरोबरच माहितीच्या दृष्टीने महाविद्यालयीन ग्रंथालयांत वापरात असलेली छपाईच्या स्वरुपातील माहिती विचारात घ्यावी लागेल.

**मुद्रण तंत्रज्ञान : पूर्वी, आज आणि उद्या**

प्रकाशित वाङ्मय, माहिती इतक्या प्रचंड प्रमाणात आणि वेगवेगळ्या रुपात उपलब्ध होऊ लागली असतांना सुद्धा छापील स्वरुपातील माहिती ही आपल्या जवळ कायमस्वरुपी राहते. परंतु यातही निधीचा विचार येतोच. कारण, मर्यादित निधीच्या प्रमाणात ज्ञानशाखांचा विस्तार होतोच आहे आणि माहितीत नवीन भर पडते आहे. त्यामुळे निधी पुरवठ्याला मर्यादा या आल्याच. प्रकाशनांच्या विशेषतः नियतकालिकांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढल्या आणि याचा फटका प्रत्येक ग्रंथालयाला बसलेला आहेच. परंतु तरीही छपाई केलेले साहित्य हे एकदा खरेदी केले की ते वारंवार खरेदी करण्याची गरज भासत नाही त्यामुळे डिजिटल ग्रंथालय हा प्रकार जरी अस्तित्वात येत असला तरीही छपाई स्वरुपातील माहिती सुद्धा लाभार्थींकरिता आवश्यकच आहे.

मुद्रण कलेचा जसजसा विकास होत गेला तसतसा नवनव्या तंत्रांचा, यंत्रांचा समावेश मुद्रण कलेत झाला. उदा. लिपीचा शोध लागण्याआधी प्रथम मौखिक माध्यमाच्या द्वारे माहितीचे आदान-प्रदान होत असे. चित्राद्वारे, संकेताच्या द्वारे, चिन्हांच्याद्वारे संवाद साधला जात असे. नंतर लिपीचा शोध लागल्यानंतर, वेगवेगळ्या प्रकारचे लेखन साहित्य वापरले गेले. जसे-भूर्जपत्र, चामडे, ताम्रपट इ.

मुद्रण तंत्रज्ञानात छपाई अंतर्गत मुद्रणाचे प्रकार पडले.

१. लेटरप्रेस

२. ऑफसेट

३. स्क्रीन प्रिंटिंग

४. डिजिटल प्रिंटिंग इ. हा मुद्रण तंत्रज्ञानाच्या पूर्वीचा प्रकार झाला.

मुद्रण तंत्रांच्या विकासानंतर मुद्रित साहित्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणांत वाढले. त्याचा परिणाम ज्ञानाचा प्रसार, ग्रंथालयांचा विस्तार, ग्रंथालयांच्या संख्येत वाढ आणि त्या दृष्टिकोनातून वाचकांना द्यावयाच्या सेवांचे प्रमाणही सतत वाढतेच राहिले आहे. मुद्रित साहित्याच्या हिशोबानेच ग्रंथेतर साहित्याची सुद्धा ग्रंथालयांतील आवक विलक्षण वाढली. या माध्यमांतून आजच्या काळात संगणकाच्या माध्यमातून ऑफसेट छपाई च्या रुपांत प्लेट मेकींग, इमेज सेटर, डीटीपी, रंगीत फोटोग्राफ्स यांच्या मदतीने छपाई होत आहे. यात पूर्वी काय होते ? आज काय आहे? व पुढील मुद्रण तंत्रज्ञानाचे भवितव्य कशावर आहे याचा सुद्धा विचार महत्त्वाचा ठरेल.

**मुद्रण तंत्रज्ञानाचे भवितव्य:**

उद्याच्या जगात इलेक्ट्रॉनिक मिडियातल्या प्रगतीमुळे डिजिटल लायब्ररी ते व्हर्च्युअल लायब्ररी पर्यंतचा टप्पा ग्रंथालयांनी गाठलेला असेल. आता तर 'कागदविरहित ग्रंथालय' किंवा ' कागदविरहित माहिती तंत्रज्ञान' ही संकल्पना उद्याच्या जगात उदयास येऊन मुद्रित

साहित्याच्या मर्यादा इलेक्ट्रॉनिक मिडियांनी घेतल्या आहे. याचे उदा. म्हणजे, आवाज ऐकायला मिळणे. प्रत्यक्ष घटना बघायला मिळणे याचा संचार झाल्यामुळे मुद्रित साहित्याची जागा या इलेक्ट्रॉनिकमिडियाने घेतली आहे असे म्हणता येईल. उलट बाजू बघता अशा प्रकारच्या माध्यमांच्या सहाय्याने साहित्याबरोबरच माहिती व ज्ञानाचा उत्तमप्रकारे वापर करणे सहज शक्य होईल.

**इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून ग्रंथालय व ग्रंथपालांचे बदलते स्वरुप :**

ग्रंथालयाचा आकार, वाचक, सेवेचे स्वरुप, उद्देश इ. बाबतीती एकमेकांपासून वेगळी असतात. परंतु त्यांच्याजवळ माहितीच्या भांडारात सर्वांचा शिरकाव व्हावा ही त्यांची महत्त्वाकांक्षा असते. वाचनालयात ठराविक साहित्यात माहिती साठविलेली असते. एकदा विशिष्ट किंमतीत ते साहित्य खरेदी केल की, त्यानंतर साहित्य विविध वाचकांकडून पुन्हा-पुन्हा कुठलीही किंमत न देता वापरले जाते. परंतु २१व्या शतकांत हाच ओघ बदलला आहे. या शतकांत माहिती ही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून उपलब्ध होत आहे. जगात साठविलेली माहिती, ज्ञान महाविद्यालीन विद्यार्थ्यांबरोबरच इतरांना सुद्धा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मिळेल.


या नवीन जगात ग्रंथपाल हा माहितीचा स्त्रोत असणारा विद्वान असला पाहिजे. त्याला उपलब्ध माहितीची ओळख असली पाहिजे. जगात इलेक्ट्रॉनिक माध्यमातून उपलब्ध असलेली, साठविलेली माहिती कशी प्राप्त करुन घ्यावी यासाठी वाचकाला मदत करता आली पाहिजे. ग्रंथपालाने त्याचे मूल्यांकन करुन योग्य माहितीची निवड केली पाहिजे. ग्रंथपालाच्या या कामाच्या बदलत्या स्वरुपामुळे त्याच्यासाठी माहिती-विश्लेषक / ज्ञान विशारद/माहिती विशारद इ. संज्ञा वापरल्या जातील.

इलेक्ट्रॉनिक माहितीच्या प्रसारात महाविद्यालयांत येणाऱ्या लाभार्थीला जर अर्थशास्त्रांत होणारे बदलत्या काळातील बदल या विषयी माहितीची आवश्यकता असेल तर त्याला ताबडतोब ती माहिती कोणत्या वेबसाईटवर उपलब्ध आहे याविषयी त्याला ज्ञान हवे. त्याला सीडी-रॉम, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, ई-मेल, प्रिंटींग इ. चे ज्ञान असावे. यामुळे माहिती पुरवणे ही सुविधा इंटरनेटच्या माध्यामातून प्रत्यक्ष उपयोग, 'उपयोग नाही-किंमत नाही/आणि भरपूर उपयोग-भरपूर किंमत' अशा प्रकारे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ग्रंथालयाचा विचार करता येईल.

**इंटरनेट :**

माहिती तंत्रज्ञानात अत्यंत महत्त्वपूर्ण व अल्प वेळांत आवश्यक असलेली माहिती इंटरनेटच्या माध्यमातून आपल्याला मिळते. इंटरनेट हे वाचकांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे बुहचर्चित व खूप वापरले जाणारे अमुद्रित माध्यम आहे. आज इंटरनेटवर हे ग्रंथालयाचे अविभाज्य अंग बनले आहे. प्रत्यक्ष साहित्यरुपात उपलब्ध नसले तरी अप्रत्यक्षपणे ग्रंथालयांत त्याचे अस्तित्व आहे व त्याचा वापरही होतो. यावरुन छापील स्वरुपाच्या माहितीबरोबरच त्या माहितीचे योग्य व्यवस्थापनही केले जाते.

इंटरनेटच्या लाभार्थींची १९८१ ते १९९५ पर्यंत झालेल्या व पुढे २००० वर्षाच्या नंतर सुद्धा होत गेलेली वाढ खालील आलेखावरून लक्षांत येईल.



सध्याची उघड वस्तुस्थिती ही आहे की, माहिती फुकट/निःशुल्क मिळत नाही त्यासाठी किंमत मोजावी लागतेच. त्यामुळे खालील घटक सुद्धा विचारात घ्यावे लागतील-

१. मागणी आणि स्रोत यात मागणी व उपलब्ध सामुग्री ह्यांचा आर्थिकदृष्ट्या समतोल ढासळतो म्हणून मागणीच्या प्रमाणात आवश्यक माहिती उपलब्ध हवी असल्यास आपल्याला त्यासाठी मूल्य मोजावे लागेल.

२. विद्यार्थी वर्गाकडून त्यांच्या प्रवेशाच्यावेळी आकारण्यात येणाऱ्या फी मध्ये विशिष्ट साहित्य वापरायचे शुल्क, विशेष सोयी इ. या अंतर्गत येतात परंतु त्यासाठी सुद्धा मूल्य द्यावेच लागते. फक्त त्या फी मध्येच सध्याच्या परिस्थितीत ग्रंथालयामार्फे पाहिजे त्या प्रमाणात सेवा पुरविणे शक्य होत नाही.

३. आर्थिक चणचणीमुळे सतत वापरल्या जाणाऱ्या साहित्याच्या जास्त प्रती वाढत्या मागणीनुसार उपलब्ध करुन देऊ शकत नाही त्यामुळे लाभार्थींना त्यांना मिळणाऱ्या साहित्यासाठी वाट बघण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

यामुळे प्रामुख्याने महाविद्यालयीन ग्रंथालयांचा विचार करता, मागणी व पुरवठा यातील समतोल राखण्यासाठी आर्थिकदृष्टीने उपाययोजना करुन गंभीरपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या दृष्टीने २१व्या शतकांतील माहिती मूल्य बघता महाविद्यालयीन ग्रंथालयांचा संबंध त्या - त्या महाविद्यालयात ज्ञान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, समितीतील सदस्य इ. पुरताच मर्यादित न ठेवता त्या ज्ञानाच्या, माहितीच्या कक्षा रुंदावण्यासाठी २१व्या शतकात ग्रंथालयांनी माहिती मिळविण्यासाठी काही योजनांचा अवलंब करावा असे सुचवावेसे वाटते.

१. महाविद्यालयांत उपलब्ध असणारी साधने ही महाविद्यालयांतील लाभार्थींबरोबरच अन्य लाभार्थींना सुद्धा मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या, नाताळाच्या सुट्ट्या, दिवाळीच्या सुट्ट्या ह्या कालावधीत काही अनामत रक्कम जमा करुन उपलब्ध करुन द्यावे. जेणेकरुन, त्या महाविद्यालया त्यातून पैसे मिळतील व त्यातील येणारी साधारणतः ६० टक्के इतकी रक्कम ग्रंथालयातील नवीन योजना, पुस्तक खरेदी इ. साठी उपयोगात आणता येईल.

२. महाविद्यालयाला लाभलेले प्रशस्त आवार असेल तर, ते सुद्धा राज्यस्तरीय स्पर्धा, मैदानी खेळांना महाविद्यालयातील जागा उपलब्ध करुन दिल्यास आलेल्या पैशांतून फक्त ग्रंथांची खरेदी न करता ग्रंथालयाकरिता आवश्यक साधनसामुग्री खरेदी करुन त्यातून जास्तीत-जास्त प्रमाणांत रि..ाय कमी वेळांत माहिती लाभार्थींना देणे शक्य होईल.

३. पुस्तकपेढी अंतर्गत रकमेचे प्रमाण जर महाविद्यालयाने ग्रंथालयांसाठी किती ? असे ठरवून दिले तर, ही रक्कम सुद्धा ग्रंथालयांच्या वापराकरिता उपयोगात येईल.

४. ग्रंथालयांतून काही ठराविक कालावधीनंतर रद्दबातल केलेले ग्रंथ महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, प्राचार्य यांच्याबरोबर महाविद्यालया व्यतिरिक्त सुद्धा इतरांना कमी शुल्कांत विकून आलेला पैसा ग्रंथालयांत माहिती चे मूल्य जोपासण्यासाठी कामी येईल.

५. विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्षात जमा करण्यात आलेल्या दंडाची रक्कम काही परदेशांतील नियतकालिके महाविद्यालयीन ग्रंथालयाकरिता घेता येतील व परदेशांतील माहिती सुद्धा लाभार्थींना मिळू शकेल.

६. काही महाविद्यालये ही फक्त सकाळच्या पाळीतच चालतात. अशा महाविद्यालयात संध्याकाळच्या वेळी त्यांच्या वर्ग खोल्या काही तांत्रिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना उपलब्ध करु दिल्यावर आलेल्या भाड्यातून ग्रंथालयाकरिता नवीन उपक्रमांचा अवलंब करता येणे शक्य होईल.

७. महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांबरोबरच इतरही विद्यार्थ्यांकरिता अल्प कालावधीत चालविले जाणारे सर्टिफिकेट कोर्सेस ह्यांना महाविद्यालयाची जागा उपलब्ध करून देणे.

८. जॉब सेंटर चालविणे जेणेकरून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुद्धा त्या मार्फत रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. ह्यातील काही भाग सुद्धा ते महाविद्यालयाला देवू शकतात व त्याचा वापर ग्रंथालयाकरिता करता येणे शक्य होईल.

वरील प्रकारच्या साधनांचा अवलंब केल्यास महाविद्यालयीन ग्रंथालयांना त्यांच्या लाभार्थीकरिता माहितीसेवा पुरविणे शक्य होईल. कारण सध्याच्या काळात माहितीचा ओघ जास्त आणि त्या प्रमाणात महाविद्यालयीन ग्रंथालयांना यु.जी. सी. किंवा शासनाकडून आर्थिक बाबी पूर्ण करणे अशक्य आहे. त्यामुळे लाभार्थींना आधुनिक काळात जर ग्रंथालयाकडून चांगल्याप्रकारे सेवा या महाग आहेत व त्या प्रत्येकाला पुरविण्याच्या दृष्टीने त्याची सध्याच्या काळात तरी किंमत मोजावीच लागेल. त्यामुळे महाविद्यालयीन ग्रंथालये या २१व्या शतकांत आघाडीवर राहून आपल्या लाभार्थींना जास्तीत -जास्त सेवा पुरवू शकतील असे या अभ्यासनिबंधाच्या माध्यमातून सुचवावे वाटते. त्याकरिता ग्रंथालयांनी प्रयत्न करणे महत्वाचे आहे.

**Select References**


1. Costs of Electronic Information : Encyclopedia of Library of and Information Science, 54 (17); P-122-141
2. Kulfalikar (C.R.) (2000) : Cost of Information in the new millennium.
3. Pathak (M) (2000) : माहिती तंत्रज्ञानाच्या युगाकडे जातांना Gyanagangotri 1(1); pp 50-52
4. Paudwal (A) (2000) : ज्ञानाचे अग्रदूत Gyanagangotri 1(2); pp 4-8
5. Riswadkar (M) (2000) : इन्फर्मेशन ॲज् ए कमॉडिटी Gyanagangotri1 (2); pp 9-12
6. Varalakshmi (R.S.R.) (1997) : University Library Services free or fee based ILA Bulletin 32 (3-4); pp11-13



**मेधा खरे**

विकोलॅबरोटरीज, ग्रंथालय विभाग,

नागपूर

medhakhare@yahoo.com


• • •

# ''प्रसारमाध्यमे - आणि मानवी विकास''

*प्रसारमाध्यमे वाढली, त्यांचा उपभोग वाढला. त्याचे अनेक वाईट परिणाम झाले. पण त्या बरोबरच प्रगतीचा वेगही वाढला. या लेखात विचारांची काहीशी पुनरावृत्ती असली तरी प्रसारमाध्यमे समाजावर परिणाम करताहेत. या वस्तुस्थितीचा विचार मांडला आहे. - संपादक*

आजच्या प्रसारमाध्यमांमध्ये प्रचंड क्रांती झाली. आणि सर्व जगच लहान झाले! मानवाच्या सुरुवातीपासूनच ज्ञानाचा प्रसार नेहमीच महत्वाचा ठरला आहे. परंतु आताच्या ज्ञानाचे महत्व जसे पुढे येत आहे, तसे कधीच नव्हते. ज्ञानाचे व माहितीच पुढचं पाऊल आहे. आज प्रसारमाध्यमांच्या रूपाने निश्चितच काहीतरी नवं पुढे येतंय.

प्रसारमाध्यमे हे एका विशाल पर्वतासारखे आहे की, ज्याचे स्वरूप आपण ज्या दिशेने त्या पर्वताकडे पाहू त्याप्रमाणे बदलत जाते. त्यामुळे माध्यम तेच राहते, केवळ आपण त्याकडे कसे पाहतो व या माध्यमातून जनमानसावर कसा परिणाम होतो हे बदलत जाते.

मुद्रण कलेचा शोध मानवी जीवनात प्रचंड खळबळ माजवणारा होतो. मुद्रणकलेने लोकांना एकमेकांच्या जवळ आणले आहे. सुमारे १४५० मध्ये जर्मनीत छपाई तंत्राची कला अवगत झाली, व गुटेनबर्गने बायबल छापले. छपाई हे सर्वच गोष्टींच माध्यमं होऊन बसले. व त्यातून लिखित शब्द निर्मिती झाली, व सामाजिक गटात वेगळा दृष्टिकोन निर्माण झाला. त्यामुळे लेखक, साहित्यिक, त्या-त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती, तसेच राजकीय नेते इ. ना लिखित माध्यमांतून विशेषतः वृत्तपत्राच्या माध्यमातून जनतेशी संवाद करणे सुलभ झाले. सरकारी धोरण जनतेपुढे मांडण्यासाठी लोकांना त्यांच्या तक्रारींना वाचा फोडण्यासाठी, तसेच शास्त्र कला, वैज्ञानिक शोध प्रक्रिया यातील माहिती जाणून घेता आली.

तसे पाहिले तर वृत्तपत्राचे आयुष्य किती कमी! केवळ एका दिवसाचं, म्हणजे चोवीस तासांच. पण कामगिरी केवढी मोठी! ज्ञान आणि मनोरंजनाबरोबरच समाजप्रबोधनाचेही कार्य व सामाजिक, राजकीय स्थितीचे हुबेहुबे दर्शन वृत्तपत्रांनी घडवले.

पुढे विद्युत शक्तीच्या शोधामुळे दूरदर्शन, दूरध्वनी, तारायंत्रे, नभोवाणी यांची निर्मिती झाली. दूरदर्शनने तर माहितीच्या क्षेत्रात दृकश्राव्य स्वरूपाची क्रांतीच केली. उपग्रहांद्वारे दूरदर्शनचे प्रक्षेपण सर्व जगास छोट्या स्वरूपात आणण्यास कारण झाले. व जगातील प्रत्येक घटनेचे पडसाद या शोधामुळे समजू लागले. ही प्रसाररूपी माध्यमं जणू ज्ञानाचे, माहितीचे उमलणारे एक सुंदर फूल आहे. त्याद्वारे आपल्याला जागतिक नव्हे, सद्य स्थितीची माहिती व ज्ञान यांचे आकलन आपल्या सुगंधाने पसरवीत असते.

रेडिओ, दूरदर्शन, सिनेमा ह्या माध्यमांचा प्रभाव सामाजिक जीवनावर मोठ्या प्रमाणावर होत असतो. वाचण्यापेक्षा ऐकणे, परिणामकारक आहे. ऐकण्यापेक्षा पहाणे परिणामकारक आहे. त्यामुळे यांचा परिणाम मुद्रणापेक्षा जास्त आहे. ह्या माध्यमांद्वारे शहरे आणि खेडी यामधील दरी कमी झाली आहे. परंतु आज त्याच्याही पुढे जाऊन मानवाने यांत्रिक प्रगती करून संगणकासारखे यंत्र प्रगत केले. व माहितीची प्रक्रिया वेग घेऊ लागली. व विनाविलंब माहिती प्रतिप्राप्तीसाठी संगणकाचा वापर होऊ लागला. परंतु संगणकाद्वारे केवळ माहितीचे आकलन होते

न होते तर त्यात नेट (माहितीचं जाळं) चा उगम झाला. नेट ही माहिती आणि संपर्क अशा दोन्ही क्षेत्रातील क्रांती ठरली. नेट च्या साहय्याने अनंत स्वरूपाची माहिती एकाच डिजिटल माध्यमातून पाठवता येऊ लागली. व ती माहिती विद्युत गतीने जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकपर्यंत पाठवता व संपर्क साधता येऊ लागली. प्रसारमाध्यमांची क्रांतीच म्हणावी लागेल, नव्हे आहेच ! या क्रांतिने सगळे जगच जवळ आले. जगात कोठेही खुट्ट वाजले की, दुसरीकडे कळते, म्हणून तर भारतातील नैसर्गिक आपत्तीच्या वेळी लातुर व गुजरात मध्ये झालेल्या भीषण भूकंपात साऱ्या जगातून मदत येऊ लागली.

प्रसारमाध्यमांच्या मोठ्या प्रमाणावरील संवादामुळे लोकांच्या आचार- विचारांवर फार प्रभाव पडत चालला आहे. मानवी जीवनाला जितकी अन्न, हवा, पाणी यांची गरज आहे. तितकीच आज प्रसार माध्यमांची गरज आहे. कारण - त्यामुळे आपल्याला सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा विकास अधिक उज्ज्वल करण्याकरिता या माध्यमांचा फार मोठ वाटा आहे. ही माध्यमे जीवन सुखकर बनवून मानवाचे राहणीमान उंचाविण्यास निश्चितच मदत करतात, असे असले तरी प्रत्येकच वेळी या माध्यमांनी व्यवहारिक जीवन सुखकर बनतेच असे नाही. या माध्यमांचा उपयोग आपण कसा करतो यावर ते अवलंबून आहे.

ही माध्यमे केवळ माहिती व ज्ञान संपादन करीत नाहीत तर ती मनोरंजन ही करीत असतात. म्हणजे - वृत्तपत्रे, ग्रंथ, मासिके हे वाचकांचे आणि आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट हे प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. या सामाजिक बदलाचा महत्त्वाचा घटक या दृष्टीने महत्वाचा ठरतो.

ग्रामीण व शहरी यांच्यात असणारे अंतर अधिक जवळ येण्यास व त्यांच्यात असणारी अंधश्रध्दा यातील दरी कमी करून त्यात परिवर्तन घडवून आणण्यास व त्याद्वारे कृषी, औद्योगिकीकरण जलसिंचन, बँकिंग, विमायोजना, वाहतुक इ. संदर्भात माहिती पुरवून अधिक सुज्ञ करण्याचा प्रयत्न केला आहे.

या नवीन येणाऱ्या प्रसारमाध्यमांचा जरी उदो-उदो होत असला तरी भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांत विकासाच्या दृष्टिकोणातून दूरदर्शनाचा उगम ही एक क्रांती म्हणावी लागेल. आज दूरदर्शन प्रेक्षपणामुळे बदल होऊन अनेक वाहिन्यांत वाढ झाली व केबल या गोंडस नावाने ती परिचित झाली. त्यामुळे बहुविध मार्गांचे व स्थानिक प्रेक्षपण व संपूर्ण जगाचा फेरफटका आपल्याला घरबसल्या करता येऊ लागला. इतर प्राण्यांपेक्षा मनुष्य हा फार बुध्दिवान प्राणी आहे, हे सांगायलाच नको. त्याने दुर्बिणीसारखे जग जवळून पाहण्याचा मंत्र दूरदर्शन आणि संगणकाद्वारे दिला.

आजच्या प्रसारमाध्यमांची प्रगती अतिशय आश्चर्यकारक आहे. परंतु तिला एक दुसरी बाजू ही आहे. म्हणजे आपल्या आजच्या पिढीवर होणारे पाश्चिमात्य संस्कार. संस्कार हा नेहमीच काळजीचा विषय होत आहे. पाश्चिमात्य संस्कृती आपल्या केबल च्या माध्यमातून घराघरांत शिरली. तरुण पिढीने या बदलाचे स्वागत केले, तर ज्येष्ठ मंडळी काळजीत पडली. आपल्या संस्कृतीवरचा हा हल्ला त्यांना भयावह वाटू लागला कारण - भारतातील संस्कृती ही आदर्श संस्कृती समजली जाते. कापडउद्योगात आपला देश पुढे आहे. तसेच खेळ, सण, व धार्मिक कार्यात नेहमी पुढाकार घेणारा आपल्या संस्कृतीचा इतिहास आहे. परंतु काळाच्या ओघात संस्कृती लोप पावत आहे. जणू उगवत्या पिढीवर हे आक्रमण झाले आहे व सांगकाम्या संगणक दिसत आहे.

दूरदर्शन केबलवर खाजगी वाहिन्या अनेक आहेत. त्यामुळे मालिका व अन्य कार्यक्रम उदंड झाले

आहेत. त्यामुळे पाश्चिमात्य वाहिन्यांचे प्रसारण इंग्रजी सिनेमा, किंवा भारतीय आधुनिक हिंदी सिनेमामध्ये पाश्चिमात्य जगाचे दर्शन इ. प्रसारांनी तरुण पिढीवर नव्हे सगळ्यांवरच जणू, जादू केली आहे. पाश्चिमात्य आचार-व्यवहाराच्या अंधानुकरणामुळे तरुणांमध्ये जी फॅशनबाजी, जाहिरात बाजी, अशुध्द आहार-विहाराच्या सेवनाची प्रवृत्ती कुसंगत, एकतर्फी प्रेम, बलात्कार इ. वाढत आहे.

चित्रपटातून व विविध मालिकातून उत्तान शृंगार हिंसाचाराचे प्रेक्षपण, त्यातील अश्लिल गाणी, अंगविक्षेपांची नृत्ये, अंगप्रदर्शन करणारे नाममात्र कपडे. यामुळे कोवळ्या वयाच्या मुळांवर अकाली वाईट संस्कार होतात. शालेय मुले ज्यांचे वय संस्कारक्षम असते. त्यांच्या बालवयात सखोल परिणाम करणारी त्यांना माहिती ज्ञान देणारी महत्त्वपूर्ण प्रसारमाध्यमे असतात. याची जाणीव ठेऊन पालकांनीही काय पाहवे, काय पाहू नये हे मुलांच्या मनावर एकतर्फी प्रेमांतून कुठे अमृता देशपांडेचा बळी जातो, तर कुठे रिंकू पाटील प्रकरण अशा घटना होत आहेत. खरे पाहता दूरदर्शनचा उगम ज्ञानदानासाठी झाला. पण आज मात्र मनोरंजन एवढेच समीकरण झाले आहे. सुरूवातीला मोजक्या कार्यक्रमांनी भारतीय दर्शकांना मोहिनी घातली. आज वाढत असलेली आधुनिक गुन्हेगारी त्यात शस्त्रास्त्रांचा मोठ्या प्रमाणात वापर, किरणोत्सर्गी पदार्थांचा वापर, नोकऱ्यांचे आमिष दाखवून चालवलेला मुलांचा आणि महिलांचा आंतरराष्ट्रीय व्यापार असे गुन्हेगारीवर आधारित चित्रपटांचे पेव फुटले आहे. त्याचा याच गोष्टींच चित्र प्रतिबिंबित झालेल दिसत. असे चित्रपट पाहण्यासाठी विशेषः लहानमुले टी. व्ही. च्या छोट्या पडद्याकडे एकाग्र होऊन पाहतात. यामध्ये हिंसक, आक्रमक दृष्य नकली कमी असलीच जास्त असल्याची धारणा पक्की होत गेली आणि स्वाभाविकच त्यामुळे कुतुहल वाढत गेले. अर्थात आपण पाहतोच वह्यांवर नट-नट्यांचे फोटो, कंपास पेट्यांतून नट-नट्यांचे जमविलेले स्टिकर जपून ठेवतांना व त्यांचा पत्त्यांचा खेळ खेळतांना आजही अनेक मुले गल्लीबोळात पाहायला मिळतात. त्याचबरोबर शाळेच्या आवारात रस्त्यांत गुटखा व धूम्रपान करताना मुले दिसतात.

काही मुलांना पाठ्यपुस्कांतील कविता पाढे, सूत्रे आठवत नाही पण एखाद्या चित्रपटांतील गाणे मात्र तोंडपाठ. तसेच थोर समाजसुधारक, नेत्यांबद्दल माहिती नसते तर सिनेमातील नट-नटींची माहिती असते. ज्या थोरांमुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. अशा नेत्यांच्या पुतळ्यांसमोर असे वेडे-वाकडे नृत्य, हाणामारीचे प्रसंग अशी दृश्ये दाखविली जातात. शेवटी काय पाश्चिमात्य देशातील स्वैर व स्वच्छंदी जीवन आपल्याला आकर्षित करीत आहे.

खरे तर टी. व्ही. व संगणक हे प्रसारमाध्यमे ज्ञान व माहिती देणारी ही मानवाचीच निर्मिती पण आज आधुनिकतेच्या वाऱ्याने व पाश्चात्यांच्या अनुकरणाने माहितीच्या युगात मानव यंत्राच्या हातातील बाहुले झाल्यासारखे वाटते.

इंग्रजांच्या आगमनानंतर आपल्याकडे ज्ञानाचा जो झपाट्याने प्रसार झाला. त्याविषयी कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी म्हटले आहे, पूर्वीच्या काळी विद्वान असणे जेवढे कठीण होते, तेवढेच आज अडाणी असणे अवघड झाले आहे. केवढी ही प्रसारमाध्यमांची किमया. आज चोहोअंगांनी ज्ञानाचा आपल्यावर सतत वर्षाव होत आहे. आजचे ज्ञान माहितीच्या स्वरूपाचे आहे.

आधुनिक जगाची रक्तवाहिनी समजली जाणारी इंग्रजी भाषा प्रत्येकाच्या नसानसात भिनली आहे. म्हणजे आजच्या जगाना कॉम्प्युटरचा आहे. कॉम्प्युटर हा सांगकाम्या आहे. तो आपला वेळ वाचवितो. ई-मेल हे आजचे आणखी एक नवल, त्याने तर आपल्या माणसांशी

तत्काळ संपर्क साधता येतो. हे कदाचित अपरिहार्य असेल! पण कोणतेही ज्ञान इतके सहज सुलभ व्हावे का ? मग चॅटिंग सारखे प्रकार व पोलिसांच्या वेबसाईट हॅकिंग करणे असे गुन्हे घडतात.

ग्रामीण भागाच्या दृष्टीने निरक्षरतेच ५०% टक्के असलेल्या देशात संगणकासारखे प्रत्यक्ष उपयोग म्हणजे मृगजळच ठरते. साक्षर लोकांच्या दृष्टिकोणातून विचार करता संगणकाची भाषा आणि त्याच्या पुढच्या पायऱ्या इंग्रजीमध्ये, मातृभाषेतील साक्षर लोकांना याचा कोणता उपयोग ?

चंद्राबाबू नायडू यांनी आंध्रप्रदेशात प्रत्येक जिल्हयाची माहिती संगणक-इंटरनेट जाळ्याने जोडून राजधानीच्या ठिकाणी बसून सर्व हालचाली केंद्रीत करता येतात. हे दाखवून दिले, पण त्याचा उपयोग पूर नियंत्रण, वादळ आदी संभाव्य आपत्ती पासून कमीत-कमी नुकसान होऊ न देणे, शेती, - सुधारणा वा बेकारी निवारण्यासाठी करता आला नाही ही वस्तुस्थिती आहे.

दूरदर्शन करमणुक करता करताच सामाजिक किंवा राजकीय संदेश देत असतात. संसदेतील चर्चा विविध प्रसारमाध्यमातून जनतेपुढे येते. यातून सरकारचा गैरकारभार, दोष, भ्रष्टाचार, धोरण जनतेला समजते. त्यामुळे काही वेळेस त्यात सुधारणा ही आणता येतात. तसेच व्यवसायातील गुपिते, राजकीय गुपिते, संरक्षणविषयक गुपिते ही कधीच फोडता येत नाही. तरीही प्रचार आणि जाहिरात करून या गुपितांना प्रसारमाध्यमांनी उघडकीस आणून भ्रष्टाचाराला तहेलका डॉटकॉम ने उजेडात आणले. त्याच प्रमाणे दूरदर्शनवर दाखविल्या सभागृहातील जे थेट प्रेक्षपण दाखविले जाते त्यात मोठ मोठी नावाजलेली नेते मंडळी आपल्या अध्यक्षांसमोर आपले मत प्रदर्शित करतांना एखादा मुद्दा पटला नाही तर खुर्च्या, टेबल, बेंच वाजवत आरडाओरड, एकमेकांवर आक्षेप घेत असे प्रसंग थेट दाखविले जातात. यातून मुलांच्या व प्रेक्षकांच्या मनावर काय परिणाम होतो ? मोठ्यांनीच शिस्त पाळली नाही तर मुलांना शिस्तीचे महत्त्व कळेल काय ?

तसेच आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री श्री. एम्. करूणानिधी व जयललिता यांच्या वैमानस्यातून श्री. करूणानिधींना झोपलेल्या अवस्थेतून पोलिसांनी त्यांना धरातून फरफटत नेले. हे दृश्य थेट दाखविण्यात आले. हे पाहताना प्रेक्षकांची भूमिका काय असावी ? त्याचप्रमाणे एक सनसनाटी बातमी प्रसारमाध्यमांद्वारे संरक्षण खात्यातील भ्रष्टाचार प्रकारची फाईल तहलका डॉटकॉम उघडकीला आले. असे हे आमचे माहिती युगातील नेते, जर प्रसारमाध्यमजे नसती तर हे प्रकरण उजेडात आलेच नसते. पूर्वीचे नेते समाजासाठी झटत त्याग करीत त्यांना प्रसारमाध्यमांची गरजच नव्हती. आजच्या नेत्यांबद्दल जी ओंगळवाणे दृश्ये थेट दाखविले जातात त्यातून काय प्रेरणा घेता येईल ? एवढे मात्र नक्की की, प्रसारमाध्यमे नसती तर भ्रष्टाचारी नेते उजेडात आलेच नसते ही प्रसार माध्यमांचीच जागृती नाही का ?

वृत्तपत्रे आकाशवाणी ही विविध माहिती आपल्यापर्यंत पोचवणारी आधुनिक प्रसार माध्यमे असून सुध्दा आता जुनी ठरु पाहत आहेत. म्हणून त्यांचे महत्त्व कमी झाले असे नाही हे जरी सत्य असले तरी ज्ञानप्राप्तीत श्राव्यापेक्षा दृकसाधनांचा फार मोठा वाटा असतो. केवळ ऐकण्यापेक्षा जे आपण पाहतो ते आपल्या स्मरणात अधिक राहते. साऱ्या जगाचा फेरफटका आपल्याला घरबसल्या करता येतो.

'जगा आणि मजा करा ' आणि मजेसाठी काहीही करा 'कुठल्याही थराला जा' मग भ्रष्टाचार, खून, बलात्कार केला तरी चालतो. प्रसारमाध्यमं आहेच उजेडात आणायला आम्ही काय वाचतो, ऐकतो, पाहतो आणि हळहळतो शेवटी काय जैसे थे !

प्रसारमाध्यम जणू उमलणारं एक सुंदर फूल असेल व आपल्या सुगंधाने माहिती, ज्ञान पसरवित असेल तरी या प्रसाररूपी फुलाला कोटेही आहेत. त्यांनी आपले हात रक्तबंबाळ होऊ शकतात. नव्हे हाच धोका जाणवला आहे. हे लक्षात घ्यायला हवे. या झाडरूपी प्रसारमाध्यमांच्या फांद्या अनेक आहेत. त्यातून 'ऑक्सीजन' घ्यायचे की, 'कार्बनडाय ऑक्साईड' घ्यायचे हे आपणच ठरविले पाहिजे नाही का ?

**निशा चंद्रकांत जाधव**

६१, कणेरी (बौध्दवाडा)

तेलगूशाळेसमोर भिवंडी

जि. ठाणे - ४२१ ३०२

• • •

माणसाजवळ विचार हे मोठे शस्त्र आहे. जो विचार करतो व प्रयत्नशील राहतो. त्याला पराभवाचे तोंड पाहावे लागत नाही. खरं, म्हणजे यश आणि अपयश यांच्यातील सीमारेषा अगदी अस्पष्ट आहेत. या दोन्ही रेषांमध्ये फारसा फरक नाही. मोती मिळविण्यासाठी सागराच्या तळाशी पाणबुड्या बुडी मारण्याचे धाडस करतो की नाही. यशाचा मोती मिळवण्यासाठी असेच धाडस हवे.

## हे ईश्वरा

तुझी कृपादृष्टी असेल तर जीवनास आधार आहे
तुझ्याविना जीवन म्हणजे केवळ अंधार आहे



# परिसर वार्ता

दिवाळीची सुट्टी सुरू झालेली असल्याने परिसरात नेहमीच्या तुलनेत शांतता अनुभवास येणे आहे. मात्र विज्ञान महाविद्यालय आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या वाचन कक्षांमध्ये नेहमी प्रमाणेच गर्दी आहे. विद्यार्थी प्रॉजेक्टस् च्या निमित्ताने सतत पुस्तकांची मागणी करीत आहेत. तर प्रोजेक्ट पूर्ण करण्याच्या घाईत घाईत दंग झाले आहेत.

ग्रंथालयाचे जाळे (नेटवर्क) पूर्ण होत आले आहे. त्यामुळे कला वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयात OPAC वापरण्याची सोय विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे. त्याचबरोबर ही ची सोय तंत्रनिकेतनातही उपलब्ध झाली आहे.

दरम्यान बी. एस्. सी. आय. टी.उशीरा सुरू झाल्याने सुट्टीतही चालू आहे. सोमवारी प्रॅक्टिकल व इतर दिवशी लेक्चर्स हे त्यांचे क्रम चालू आहे.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**



**डॉ. नागेश टेकाळे**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागातील प्रपाठक डॉ. नागेश टेकाळे जिनेव्हा येथील ग्लोबल फोरम फोर हेल्थ रिसर्च या जागतिक स्तरावर कार्य करणाऱ्या संस्थेच्या विशेष निमंत्रणानुसार अलीकडेच जिनेव्हा येथे जाऊन आले. या संस्थेने जगातील अनेक वैद्यकीय तज्ज्ञांची बैठक आयोजित केलेली होती. या बैठकीत डॉ. टेकाळे यांनी 'वारली आदिवासी बालकांचा आहार-कुपोषण त्या संबंधीचे होणारे आजार व उपाय योजना' या त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष सादर केले. डॉ. टेकाळे ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीच्या आहारावर गेली आठ वर्षे संशोधन करीत आहेत.

आरोग्य बैठकीनंतर त्यांनी डब्ल्यू. एच्. ओ. या जागतिक आरोग्य संघटनेसही भेट दिली. याच वर्षी एप्रिल मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत (हेनाई येथे) भाग घेतला होता. दिशा मध्ये त्यांची सविस्तर मुलाखत यापूर्वीच प्रसिध्द केली होती. आहार शास्त्रातील डॉ. टेकाळे यांचे संशोधन अजूनही सुरू आहे.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग**

**श्रावण प्रकल्प**

श्रावणमासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहिकडे

असा हा श्रावण महिना हर्षाचा, उल्हासाचा, आनंदाचा.

अशा या महिन्याला अनुसरुन पूर्व प्राथमिक विभागाने 'श्रावण प्रकल्प' करण्याचे योजिले आणि लगेच या उपक्रमाला मंडळाची मान्यता मिळाली.

मग काय ? मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य यांच्या अमोल मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षिका, सेविका व लिपिका जोमाने प्रकल्प सादर करण्याच्या तयारीला लागले.

आणि ...... आणि दि. १९ ऑक्टोबर, २००१ या शुभदिनी मा. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या शुभहस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन झाले. हा श्रावण प्रकल्प डॉक्टरांना अतिशय भावला.





लो. टिळक पुण्यतिथी, १५ ऑगस्ट हे श्रावणातील राष्ट्रीय सण तर साजरे केलेच, त्याचबरोबर श्रावणी सोमवार-शंकाराला वाहिली जागारी दर सोमवारची शिवामुठ, तसेच प्रत्यक्ष अमरनाथाचे दर्शन घडल्याचा आनंद रसिकाच्या चेहऱ्यावर दिसत होता. मंगळागौरीची पूजा, व शेळ्या पूजत आहेत, त्या आनंदाने अन्न ग्रहण करीत आहेत. त्यांचे खेळ चित्ररूपाने दाखवले गेले. त्याच बरोबर बुध-बृहस्पती पूजन, नागपंचमी, वर्णसठी, शिळासप्तमी, श्रावणी शुक्रवार म्हटले की जिवतींची पूजा असं सर्व मांडले होते. तसेच संपत शनिवार, शनि शिंगणापूर प्रत्यक्षात आहे तसेच सादर करण्याचा प्रयत्न करण्यात आला.




त्यानंतर क्रमाने नारळीपौर्णिमा, रक्षाबंधन प्रत्यक्ष कळत्या पुलाचीच आठवण करून देत होते. गोकुळअष्टमी हा सणही अतिशय हुबेहुब सादर केला होता. कृष्णाचा तुरुंगातील जन्म, वसुदेवाचे नंदाघरी गमन, दही-हंडी ही दाखवली गेली. लगेचच बैलपोळा ढोलताशांच्या गजरात बैलांना सजवून त्यांची निघालेली मिरवणूक खरोखरीच वाटत होती. श्रावणातील अखेरचा सण म्हणजे पिठोरी अमावास्या म्हणजेच मातृदिन हा सणही खूप छान सादर केला गेला. या सणाला चौसष्ट योगिनींची पूजा केली जाते. मातृदिनाला आईंची पूजा करून नमस्कार करतात तेही दाखवले होते. म्हणजेच एकूण श्रावण महिन्यातील अथपासून इतिपर्यंत सर्व सण साजरे केले होते. पालकवर्गाचे विशेष साहाय्य लाभले.



या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळाला. लोकांच्या आग्रहास्तव तीन दिवस प्रकल्प ठेवण्यात आला.

अभिप्रायासाठी तर रांग लागली होती. अगदी तिसरी-चौथीची मुलेही अभिप्राय लिहिण्यासाठी रांगेत उभी होती.

पालकवर्गही खूप होता. काही काही सणांबद्दल एवढी बारीक सारीक माहिती आपल्याला अजिबात नव्हती अशी त्यांच्यात चर्चा चालू होती. एकूण काय 'उपक्रम' उत्तमच झाला.

व्रतस्थ बनवणारा, तर वृद्धांना देवाशी गुजगोष्टी करु देणारा असा हा मास म्हणून तर लहानांपासून थोरापर्यंत हवाहवासा वाटतो.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर आयोजित आकाश कंदील व भेटकार्ड प्रदर्शन**



**नौपाडा येथील डॉ. बेडेकर विद्या मंदिरमध्ये आयोजन केलेल्या आकाश कंदील व भेटकार्ड प्रदर्शनाचे उद्‌घाटन करतांना दै. सन्मित्रच्या प्रकाशिका सौ. तनुजा जोशी, सोबत डॉ. वा.ना. बेडेकर, मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, सौ. कल्पना बोरवणकर, श्री. वि. करंदीकर आदी दिसत आहेत.**

बेडेकर विद्या मंदिरमध्ये गुरुवा दि. १८ ऑक्टोबर रोजी आकाश कंदील आणि भेटकार्डांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. इ. ६वी व ७वी तील विद्यार्थ्यांनी केलेल्या कलाकृती यात मांडण्यात आल्या होत्या.

या प्रदर्शनाचे उद्‌घाटन दैनिक सन्मित्रच्या प्रकाशिका सौ. तनुजा विजय जोशी यांच्या हस्ते फीत कापून व दीपप्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.सविता केळकर, विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर, सेवानिवृत्त शिक्षक प्र. ग. वैद्य, उपमुख्याध्यापिका ज्योत्स्ना चौवळ, पर्यवेक्षक प्र. वा. कुलकर्णी, म. रा. शिक्षक परिषद, ठाणे शाखेचे अध्यक्ष ठाकूरदास लोहाणा सर, कार्यवाह अशोक राव, प्रदर्शनाच्या आयोजिका सौ. कल्पना बोरवणकर आणि इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिक्षिका सौ. आशालता लोखंडे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला तर मुख्याध्यापिका सौ. केळकर यांनी स्वागत केले. प्रदर्शनात वेगवेगळ्या प्रकारचे, आकाराचे , सुंदर सजावट केलेले आकाश कंदील व शेकडो भेटकार्डे मांडण्यात आली होती. प्रदर्शन पाहिल्यानंतर मत व्यक्त करताना सौ. तनुजा जोशी म्हणाल्या की, मुलांकडून असा सुंदर वस्तू तयार करुन घेणे हे कसब आहे. प्रत्येक भेटकार्ड वेगळे असून त्यात प्रत्येक मुलाने आपले वेगळेपण दाखवले आहे. अशाप्रकारे हे सुंदर प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल त्यांनी शाळेस व हस्तकला शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर यांना धन्यवाद दिले.

**एनएसएसतर्फे जोशी-बेडकर महाविद्यालयात रक्तदान शिबीर**

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभागाच्या वतीने १ ऑक्टोबर रोजी रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीराचे उद्‌घाटन प्राचार्य स.वा. गोखले यांनी केले. महाविद्यालयाच्या अधिकाधिक विद्यार्थ्यांनी रक्तदान करुन कार्यक्रम यशस्वी केला.

याकार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. वडगुजर सर, प्रा. सौ. दोशी आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एन.एस.एस. विभागाचे प्रमुख प्रा. सुभाष शिंदे, सचिव प्रवीण सोनावणे, सहसचिव श्वेता शेंडे, आनंद नावर, सचिन गरड आदींनी परिश्रम घेतले. या शिबीराल मालती मोहन जीवक संस्था रक्तपेढी यांचे सहकार्य लाभले.

**आधुनिकीकरणाकडे ग्रंथालयांची वाटचाल**

एक वृत्तांत (सदर वृत्तांत अमिता वैद्य हिने तयार केला आहे.)

ठाणे नगर वाचन मंदिर, येथे राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान यांच्या अर्थसहाय्यामधून एक परिसंवाद ४ नोव्हेंबर २००१ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष वि.प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर हे होते. तर प्रा. मोहन पाठक सर व बारसे सर हे ठाणे महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रमुख वक्ते म्हणून होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. नंतर दीपप्रज्वलनाचा कार्यक्रम झाला. या नंतर स्मिता खाडे यांनी सरस्वती स्तवन केले. व कार्यक्रमाची सुरुवात झाली.

माहिती मिळवणे हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे. मानवी समाजाची वाटचाल ज्ञानाधिष्ठित समाजाकडे होत आहे. ग्रंथालये ही समाजाची अविभाज्य घटक आहेत. इतर क्षेत्रांप्रमाणे ग्रंथालयातही तांत्रिक बदल घडत आहेत त्यामुळेच जगात क्रांती होऊ शकेल त्यासाठी 'मानसिकता' व 'इच्छाशक्ती' हे यातील दोन प्रमुख टप्पे आहेत व यातूनच अद्ययावकता येऊ शकेल असे प्रतिपादन डॉ. विजय बेडेकर यांनी 'तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावर बोलताना केले.

श्री. पाठक सरांनी ग्रंथालये म्हणजे काय, त्यांना बदलण्याची गरज का निर्माण झाली व कसे बदलायचे यावर आपले विचार प्रकट केले. ग्रंथलयाला कायद्याचे पाठबळ असते. त्याद्वारे निःशुल्क सेवा दिली जाते, सार्वजनिक निधीतून खर्च केला जातो. ती शिक्षण संस्थेला सहाय्यक असतात.

ग्रंथालयाच्या सेवांचे स्वरुप कसे बदलता येईल यावरही श्री. पाठक सरांनी आपले विचार मांडले. पारंपरिक सेवांचे आधुनिकीकरण व्हायला हवे. संदर्भ सेवेवर अधिक भर हवा. निवडक माहितीचे प्रसारण ही पण ग्रंथालयांची जबाबदारी आहे. तसेच ग्रंथालयांचे रुपांतर माहिती केंद्रात होण्याची आवश्यकता आहे.

आज मुक्त शिक्षणाचा प्रसार देशभर होत आहे. त्यामुळे ग्रंथालयांनी बदलणे अपरिहार्य आहे. वाचकांचा वेळ महत्त्वाचा आहे. दूरदर्शन, संघणक, टेलिफोन, इंटरनेट नेटवर्क इ. आधुनिक साधनांचा वापर अपरिहार्य आहे. अडचणींचा पाढा न वाचता समाजभिमुख उपयुक्त काम करणे जरुरीचे आहे, असे ही पाठक सरांनी सांगितले.

श्री. बारसे सरांनी संगणीकरणाच्या दिशेने आपले विचार मांडले. विनाविलंब सेवा, ग्राहकांचा वेळ व उपलब्ध वाचन साहित्याचा अधिकाधिक उपयोग हे मुख्य कार्य संगणीकरणाने होऊ शकते.

ग्रंथायलाचा डाटा बेस तयार करणे ग्रंथालयाची अंतेर्गत कामे, सी.डी. रॉम व तत्सम साधनांचा वापर ई-मेल व इंटरनेट सेवेचा वापर ग्रंथालयाचा विकास या मुद्यावर बारसे सरांनी आपले विचार मांडले.

या नंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. त्यानंतर 'ध्वनीचित्रफित' दाखवण्यात आली. श्री. अविनाश कासार यांनी आभारप्रदर्शनचा कार्यक्रम केला. कार्यक्रमाची सांगता सौ. काळे यांनी केलेल्या पसायदानाने झाली.

•••

# लेखन सहकार्याचे आवाहन

चांगले कसदार आणि विचारपरिपूर्ण साहित्य हा मोठा सांस्कृतिक ठेवा असतो. स्वातंत्र्योत्तर काळात अशा पद्धतीचे लेखन गेल्या शतकाच्या मानाने कमी प्रमाणात केले गेले असे आढळते. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सांस्कृतिक वाटचालीतही आपले वैशिष्ट्य निर्माण करू पाहणाऱ्या आमच्या विद्या प्रसारक मंडळ या मातृसंस्थेने 'दिशा' हे व्यासपीठ सुरू करावयाचे ठरविले. डॉ. विजय बेडेकर यांच्या कुशल संपादना खाली आम्ही दर्जेदार साहित्य असण्याचे अंक देण्याची परंपरा सुरू केली.

हा अंक अधिकाधिक वाचनीय व्हावा, त्याला समाजप्रबोधनाच्या अंगीकृत कार्यात आपला ठसा निर्माण करता यावा, या दृष्टीने आम्ही आपल्याला लेखन सहकार्याचे आवाहन करीत आहोत.

कथा, कादंबऱ्या, कविता यापेक्षा वेगळे, समाजप्रबोधनास उपयुक्त ठरेल अशा प्रकारचे लेख आपण आमच्या कडे पाठवावेत. आपण पाठवीत असलेले लेख, लेखन संशोधनाच्या अंगाने जाणारे असे असावे अशी ही आमची अपेक्षा आहे. आपणास लेखनाच्या दृष्टीने काही मार्गदर्शन हवे असल्यास किंवा विचारविनिमय करावयाचा असल्यास संपादक या नात्याने आपल्याला भेटणे आम्हाला नक्की आवडेल. आपण ज्या क्षेत्रात काम करत असाल, संशोधन करत असाल त्या क्षेत्रातील अनुभवावर आधारित, निरीक्षणावर आधारित असे लेखन आपण करावे, अशी आमची विनंती आहे.

आपला लेख नवीन विचार देणारा असणे आवश्यक आहे. तसेच पुनर्मुद्रित, झेरॉक्स केलेले लेख कृपया पाठवू नयेत. लेखाची सुवाच्य अक्षरातील, एकाच बाजूस लिहिलेली प्रत असावी. तरी विद्या प्रसारक मंडळाचे हे आवाहन लक्षात घेऊन आपण आम्हाला सहकार्य करावे. आपले लेख पाठविण्यासाठी आमचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ**

नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

(टीप - लेखांची निवड संपादक मंडळाच्या निर्णयावर अवलंबून आहे, लेख पाठवला म्हणजे प्रसिद्ध होईलच असे कृपया गृहीत धरू नये)

# आवाहन

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संदेशवहन अतिशय गतिमान झाले आहे. संगणकाचा प्रसार हेही त्याला एक महत्त्वाचे कारण आहे. माहितीचा महामार्ग असे ज्याचे वर्णन केले जाते त्या इंटरनेट तंत्रज्ञानामुळे जगातील सर्व संगणक एकमेकांशी जोडले जाऊन माहितीची उपलब्धतता वाढली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर एकूण जगात इंटरनेट हे माध्यम अतिशय वेगाने विकसित होत आहे.

फोन आणि मोडेम यांचा वापर करुन इंटरनेटशी जोडणी मिळवणे हा एक प्रकार आहे. यामध्ये महत्त्वाचा तोटा म्हणजे गती कमी असते. तसेच विश्वासर्हता देखील कमी होते. हा तोटा दूर करायचा असेल तर अनेक जणांनी एकाच जोडणीवर काम करणे हे अधिक फायद्याचे ठरु शकते. त्यासाठी 'लीज लाईन' घेणे व अशा लीज लाईनच्या माध्यमातून इंटरनेटशी जोडणी मिळवणे हे अधिक विश्वसार्ह ठरु शकते. विद्या प्रसारक मंडळ या आमच्या संस्थेने महाविद्यालय परिसरात अत्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन (फायबर ऑप्टिक्स) परिसरातील ग्रंथालये एकमेकांशी जोडली आहेत. याच फायबर ऑप्टीक्स तंत्रज्ञानाचा वापर करुन परिसरात लीज लाईन घेणे आम्हाला शक्य झाले आहे. या लीज लाईनच्या माध्यमातून इंटरनेटशी सरळ संपर्क आम्ही साधू शकतो. त्यासाठी, विद्या प्रसारक मंडळाने एक प्रकल्प हाती घेतला आहे.

आता महाविद्यालय परिसरातून सर्व विद्यार्थी आणि शिक्षक या लीज लाईनचा वापर करुन इंटरनेट माध्यम वापरु शकणार आहेत. बाहेरील सायबर कॅफेमध्ये माहितीच्या उपलब्धतेसाठी ताशी अंदाजे २५ रुपये खर्च येतो. परंतु तीच सोय महाविद्यालय परिसरात आम्ही केवळ १०रुपये इतक्या कमी किंमतीत उपलब्ध करुन देणार आहोत. तेव्हा, परिसरातील सर्वांना असे आवाहन आहे की, या सोयीचा फायदा घेऊन माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात स्वतःला अद्यावत ठेवावे.

कार्याध्यक्ष

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

हे मासिक प्रकाशक आणि संपादक श्री. अनंतकुमार दिघे व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परचेकर प्रिंटर्स, गुरोबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०२ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.